# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१४ |
| वर्ष | : | एकोणपन्नासावे |
| अंक | : | पहिला |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१२**

**गणपत्रिका क्रमांक : १७९**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
**गुंडोपंत हरिभक्त**

**वार्षिक ऐच्छिक देणगी**
**किमान ७५ रुपये**

**दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.**
**भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $**

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

**सुवर्णमहोत्सव १५ ऑगस्ट १९६५ ते १४ ऑगस्ट २०१५**
**वर्ष : एकोणपन्नासावे, अंक : पहिला, चैत्र / वैशाख शके १९३६, एप्रिल २०१४**

## *संपादकीय*
## ''सद्धर्म'' सुवर्णमहोत्सवी वर्ष २०१४-२०१५

'सद्धर्म' त्रैमासिकाचा पहिला अंक १५ ऑगस्ट १९६५ ला श्री. गोविंद महादेव नवाथे यांनी प्रकाशित केला. १५ ऑगस्ट २०१५ ला 'सद्धर्म' प्रकाशनाला ५० वर्षे पुरी होत आहेत. त्यानिमित्त २०१४-२०१५ हे वर्ष 'सुवर्णमहोत्सवी' वर्ष म्हणून सद्धर्मतर्फे साजरे होणार आहे. या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सुरुवात म्हणून सौ. धनश्री लेले यांचा ''कालिदासाचे मेघदूत-आस्वादक रसग्रहण'' हा कार्यक्रम दि. १८ मार्च ते २१ मार्च (मंगळवार ते शुक्रवार) या दिवशी संध्याकाळी ७ ते ९ या वेळात घंटाळी, ठाणे येथील सहयोग मंदिरात आयोजित केला होता. ठाणे भारत सहकारी बँकेने हा कार्यक्रम प्रायोजित केला होता. आनंदाची गोष्ट म्हणजे श्रोतृवर्गाने या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद दिला. सौ. धनश्री लेले यांचे संस्कृतवरील प्रभुत्व, ओघवती वाणी व कालिदासाच्या वाङ्मयाचा सखोल अभ्यास यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

श्री. नवाथे यांनी 'सद्धर्म' त्रैमासिकाची निर्मितीच एका विशिष्ट हेतूने केली होती. सुसंस्कृत, सदाचारी, नीतिमान आणि प्रामाणिक तरुण पिढीच्या निर्मितीकरता एक 'साधन' म्हणून 'सद्धर्म' त्रैमासिक त्यांनी चालू केले. संस्कारक्षम वयातील नागरिकांना चांगले साहित्य वाचायला मिळाले तर ते सक्षम राष्ट्र निर्माण करू शकतील हा त्यांचा दृढ विश्वास होता. श्री. नवाथे यांचा स्वतःचा सुगंधी द्रव्ये आणि रंगांचा व्यापार होता. त्यांच्या स्वतःच्या जीवनप्रवासाचाच वेगळा अभ्यास व्हायला हवा.

२० व्या शतकात भारतामध्ये बरेच विचारवंत साम्यवादी विचारसरणीने भारावून गेले होते. साम्यवादी विचारसरणीची मूस हीच मुळी युरोपमधील औद्योगिक क्रांती, तेथील धर्माचा अतिरेक आणि सरंजामशाहीच्या पार्श्वभूमीवर

(पृष्ठ क्र. ३१ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)
परदेशस्थ सभासदांना १२५ पहिली आजीव सभासद योजना १९७६ ते १९७८ पर्यंत होती. त्याकरता देणगी फक्त २५ रु. होती. (त्यावेळी वार्षिक देणगी २ रु. होती.) काही तांत्रिक कारणाने ती योजना बंद करावी लागली. पुन्हा एप्रिल १९९८ ते मार्च २००० पर्यंत आजीव सभासद योजना अस्तित्वात होती. याकरता ५०० रुपये देणगी होती. गेल्या काही वर्षापासून महागाई उत्तरोत्तर वाढत जात आहे. यामुळे ही योजना एप्रिल २००९ पासून बंद करण्यात आलीव नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | **108849300955** | **SBIN 0009056** |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे(प.) | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे(प.) | **002115000024520** | **TBSB 0000002** |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी,** कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८ ०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी मनीऑर्डर किंवा धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित,** ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे४००६०१. दूक्र : २५४७२००५, भ्रक्र: ९८१९६९३१९५

अंकाच्या पाकिटाच्या पत्त्यावर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष दिले आहे.

**- संपादक**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी,वाक्प्रचार | ४ |
| सार्थ श्रीशङ्कराचार्यविरचितो श्रीशिवमानसपूजा। | ६ |
| 'नामसाधना' या विषयावरील काही बोधवाक्ये | ७ |
| कवी कालिदासकृत मेघदूताचे आस्वादक रसग्रहण | ११ |
| गीतकृष्णायन-भाग २ . कृष्णलीला | १३ |
| अध्याय १७ : श्रद्धात्रय विभाग योग | १६ |
| अध्याय १८ वा : अर्जुनोत्थान योग | १७ |
| अर्थशास्त्राची परंपरा | २३ |
| एकाग्रता – यशाची गुरुकिल्ली | २६ |


### सद्धर्माची प्रकाशने

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्व शीर्षातील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ३० |

### दीर्घकालीन सभासद (दी का) व देणगी जानेवारी ते मार्च २०१४

| | | |
|---|---|---|
| सौ. अंजना चारुचन्द्र देवस्थळे | श्रीमती विजया गोखले | श्री. भालचंद्र के. मराठे |
| श्री. सुधीर सदानंद देसाई | श्री. रा. ग. सरदेसाई | सौ. शुभदा मोहन बापट |
| श्री. श्रीकृष्ण मथुरे | सौ. प्रभा वसंत पेंडसे | सौ. रश्मी राजकुमार पाटील |
| श्रीमती शलिनी गोडबोले | डॉ. प्रमोद पूरोहित | श्री. अशोक दातार |

### मेघदूत कार्यक्रमासाठी विशेष देणगी

सौ. अनुपमा देवधर रु. ५०१/-

| | |
|---|---|
| सौ. सुरेखा ओलतीकर रु.५०० /- | श्रीमती स्वाति प्र. गुणे रु. ५००/- |
| श्री. योगेश प्र. वैद्य रु. ३००/- | सौ. उज्वला लेले रु. ३००/- |
| श्रीमती मृणालिनी देशपांडे रु. २०१/- | डॉ. श्री. श्रीराम म. भातखंडे रु. २००/- |
| श्री. अरुण व. कुलकर्णी रु. १११/- | श्रीमती सुचेता देशपांडे रु.१००/- |
| श्रीमती प्रतिभा धर्माधिकारी रु. १००/- | सौ. सुनीता परांजपे रु. १००/- |

श्री. प्रभाकर वि.दाभोळकर रु. ५१/-

**– संपादक**

लेख १८ वा

**उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।।**[२६६]

उद्योग केला तरच मनोरथ यशस्वी होतात. सुभाषिताची दुसरी ओळ – न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः।। झोपलेल्या सिंहाच्या तोंडात प्राणी आपणहून प्रवेश करीत नाहीत. इंग्रजी वाक्प्रचार : To build up castles in the air

मराठी म्हण – दे रे हरी खाटल्यावरी.

टीप – सुप्तस्य सिंहस्य ही संस्कृतमधील विशिष्ट वाक्यरचना आहे व हिला 'सत्षष्ठी' म्हणतात. अर्थ निंदात्मक असतो.

**उद्योगिनः करालम्बं करोति कमलालया।**[२६७]

उद्योगी माणसाच्या हाताला लक्ष्मी आधार देते. दुसरी ओळ – **अनुद्योगिकरालम्बं करोति कमलाग्रजा।।**

अनुद्योगी माणसाच्या हाताला अलक्ष्मी (अवदसा) हात देते. कमल+आलय – जिचे कमळ हे राहण्याचे स्थान आहे. कमलायाः अग्रजा कमलाग्रजा– लक्ष्मीची मोठी बहीण (उपरोधात्मक)

**उद्योगः खलु कर्तव्यः फलं मार्जारवद्भवेत्।**[२६८]
**जन्मप्रभृति गौर्नास्ति पयः पिबति नित्यशः।।**

माणसाने उद्योग असा निवडावा की त्याला लाभ मांजरासारखा व्हावा. जन्मापासूनच गाय नसूनही सतत दूध मात्र प्यायला मिळते.

**(एवं) चलितवित्तस्तु वित्तशेषं न रक्षति।।**[२६९]

(याप्रमाणे) पैसा जायला लागला की मनुष्य राहिलेल्या पैशाचे पण रक्षण करीत नाही. पहिली ओळ – **यथा मलिनैर्वस्त्रैर्यत्रतत्रोपविश्यते।**
मलिनैः + वस्त्रैः + यत्र + तत्र + उपविश्यते. ज्याप्रमाणे एकदा कपडे मळले की माणूस इथे तिथे कोठेही बसतो व कपडे अधिक मळतील याची पर्वा करीत नाही त्याप्रमाणे तो पैसा जायला लागला की राहिलेल्या पैशांचे पण रक्षण करीत नाही.

**कौशेयं भोजनावधिः।**[२७०]
जेवणाच्या वेळी रेशमी वस्त्र (सोवळे) नेसावे.
**कार्पासं कटिनिर्मुक्तं**
कापसाचे वस्त्र कंबरेवर नेसावे.
त्याला वेळेचे बंधन नाही.
**तृणवस्त्रं सदाशुद्धं**
तृणवस्त्र (वल्कले) नेहमीच शुद्ध
**ऊर्णा वातेन शुद्धति।।**
लोकरीचे वस्त्र हवेने शुद्ध होते.

**कर्तव्यमेव कर्तव्यं प्राणैः कण्ठगतैरपि।**[२७१]
आपले प्राण कंठाशी आले तरी आपण आपले कर्तव्य पार पाडलेच पाहिजे.
**अकर्तव्यं नैव कर्तव्यं प्राणैः कण्ठगतैरपि।।**
आणि आज जे करणे योग्य नाही ते प्राण कंठाशी आले तरी करता कामा नये.

**क्रोधो मूलमनर्थानां, क्रोधः संसारबन्धनम्।**[२७२]
राग हे सर्व अनर्थांचे मूळ आहे. क्रोध हे जगाचे बन्धन आहे. दुसरी ओळ – **धर्मक्षयकरः क्रोधः, तस्मात् क्रोधं विवर्जयेत्।।**

मराठी म्हण – अति राग अन् भीक माग.

**खलानां कण्टकानां द्विविधैव प्रतिक्रिया ।**[२७३]
**उपानदमुखभङ्गो वा दूरतो वा विसर्जनम् ।।**

दुष्टांकरिता आणि काट्यांकरिता दोन उपाय सांगितलेले आहेत. एक तर त्यांचे तोंड जोड्याने (उपानद्) फोडावे किंवा त्यांना लांबूनच टाळावे.

**तावश्च शोभते मूर्खो यावत् किञ्चित न भाषते ।।** [२७४]

मूर्खाने जोपर्यंत तोंड उघडलेले नसते (बोलण्यासाठी) तोपर्यंतच तो शोभून दिसतो. पहिली ओळ – दूरतः शोभते मूर्खो, लम्बशाटपटावृत्रः । लांबलचक अंगरखा घालून रुबाब करणारा मूर्ख लांबूनच शोभून दिसतो.

**तद्वत् भूतसमागमः ।**[२७५]

माणसांच्या गाठीभेटी फारच क्षणैक असतात. श्लोकाची सुरुवात – यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ, समेत्य च व्यपेयातां तद्वत्... ।

ज्याप्रमाणे पाण्याच्या मोठ्या प्रवाहात वाहत आलेली दोन लाकडे क्षणैक जवळ येतात आणि नंतर विभक्त होतात त्याप्रमाणे माणसांच्या गाठीभेटीविषयी आहे. पुनर्मीलन होते किंवा होतही नाही. क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रेखुर्द, ता. कर्जत
जि. रायगड – ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

## पुढील साधावया कार्यार्थू...

निर्णायक युद्धाच्या उन्मादाने कौरव-पांडवांची सैन्ये समोरासमोर उभी ठाकली. घटका बुडायला उत्सुक होती. ती बुडाली असती म्हणजे घनघोर महायुद्धाला सुरवात झाली असती-पण सैन्याच्या मध्यभागी येऊन प्रत्यंचेचा ठणत्कार करून युद्धाला आरंभ करण्याच्या क्षणी अजुर्नाच्या मनात अहिंसेचा, आप्तेष्टांच्या मृत्यूचा, अधर्माचा, वर्णसंकराचा शास्त्रानुसारी पण अप्रासंगिक-अविचार निर्माण झाला. हातांतील शस्त्रास्त्रे टाकून उद्गारला, हे भगवन्ता, श्रीकृष्णा, मी भिक्षा मागून पोट भरीन, विपन्नावस्थेत मेलो तरी चालेल पण गुरुजनांच्या, आप्तेष्टांच्या रक्ताने माखलेले राज्य मिळविण्याकरता युद्ध करणार नाही.

अशा ऐन वेळी श्रीकृष्णाने ढेपाळलेल्या अर्जुनाला वैश्विक जीवनाचे वास्तव रुप दाखविणारी गीता सांगितली. ब्रह्मज्ञानाच्या गप्पा मारणाऱ्या अर्जुनाला ब्रह्माचे वास्तव ज्ञान घडविले.

आरंभी धर्माधर्माचे वास्तव नसल्यामुळे युद्ध न करु इच्छिणारा अर्जुन, गीता ऐकल्यानंतर सर्व विश्व ब्रह्ममय आहे. अर्थात मी सुद्धा इतरांप्रमाणेच ब्रह्मच आहे. आपण सर्वजण जर एकच आहोत, मग युद्ध कां करावे, अशी शंका अर्जुनाच्या मनात येईल आणि पुन्हा गोंधळ होईल हे भगवन्तांनी ओळखले आणि गोंधळात पडू न देता, ब्रह्मरून अर्जुनाला, भौतिक अर्जुनाला, अर्जुनाच्याच केवळ वीरवर अर्जुनाच्या रूपांत कसा उभा केला याचे मनोरम दर्शन ज्ञानदेवांनी पुढील श्लोकांत वर्णन केले आहे.

पूर्णब्रह्म जाला पार्थु । तरी पुढील साधावया कार्यार्थू । मर्यादा श्रीकृष्ण नाथू । उल्लंघों नेदी ।। एऱ्हवीं आपुले करणें । सर्वज्ञ काय तो नेणे परि केले पुसणे । याची लागीं ।। एवं करोनियां प्रश्न । नसतेचि अर्जुनपण । आणोनियां जाले पूर्ण पण । ते बोलवी स्वयें ।।
(सद्धर्म त्रैमासिक कै.ह.ज.दामले स्मृति विशेषांकातून)

लेख १ ला

संधी, रूपे, समास, वृत्त, अन्वय व भाषांतरासहित.

पूर्वीच्या काळात माणसाला आपल्या आराध्यदैवताची षोडशोपचार पूजा करायला भरपूर वेळ होता व त्यामुळे तो आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, अभिषेक, वस्त्र, उपवस्त्र, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, प्रदक्षिणा, नमस्कार इत्यादी विधी त्या त्या संबंधी मन्त्रोच्चार करून शांतपणे व एकाग्रचित्ताने करीत असे. त्यानंतर मंत्रपुष्प व स्तोत्रपाठ व शेवटी प्रार्थना झाल्यावर पूजाविधी आटोपत असे.

आता माणसाची जीवनशैली बदलल्यामुळे त्याला एवढे सगळे करायला वेळ राहिला नाही. त्यामुळे असलेल्या थोडक्या वेळात पूजा आटोपावी लागते व त्यात एकाग्रचित्त होत नाही. याशिवाय हल्ली शहरी जीवनात पूजासाहित्यही मिळणे कठीण झाले आहे. फुले मिळतात, पण ती शिळी असतात. दूर्वा, तुळशी नावालाच असतात...इत्यादी. ह्या सर्वांवर उत्तम उपाय म्हणजे 'शिवमानसपूजा'. कोणतेही साहित्य लागत नाही. मनानेच सर्व साहित्य देवाला अर्पण करायचे असते. सर्व उपचार मनानेच असल्यामुळे चित्ताची एकाग्रता होतेच व वेळ थोडा लागतो. ह्यातील श्लोकांमध्ये श्रीशंकराचार्यांनी शार्दूलविक्रीडित हे वृत्त योजलेले असल्यामुळे ते म्हणताना तल्लीनता येते व क्षणभर सर्व विश्वाचा विसर पडतो.

अशा ह्या मानसपूजेची इत्थंभूत माहिती देण्याचा प्रयत्न ह्या लेखात केला आहे.

**श्लोक १ ला**

**रत्नैः कल्पितमासनं हिमजलैः स्नानं च दिव्याम्बरं**
**नानारत्नविभूषितं मृगमदामोदाङ्कितं चन्दनम्।**
**जातीचम्पक बिल्वपत्ररचितं पुष्पं च धूपं तथा**
**दीपं देव दयानिधे पशुपते हृत्कल्पितं गृह्यताम्।।१।।**

**संधी** – कल्पितम् +आसनम्, दिव्य+अम्बरम्
मृगमद+आमोद+अङ्कितम्

**रूपे** – रत्नैः – रत्नांनी, कल्पितम् – कल्पिलेले
आसनम् – बैठक, अम्बरम् – वस्त्र
दिव्य – स्वर्गीय, विभूषितम् – सजवलेले
मृगमद – कस्तूरी, आमोद – सुवास
जाती – जाई, चम्पक – चाफा
बिल्वपत्र – बेलाचे पान, दयानिधी – दयेचा सागर
पशुपति – शंकर हृत्कल्पितम् – मनाने कल्पिलेले
गृह्यताम् – हे देवा, आपण स्वीकार करावा.

**समास**

हिमजलैः – थंड पाण्याने.
दिव्याम्बरम् – स्वर्गीय वस्त्र.
नानारत्नविभूषितम् – निरनिराळ्या अनेक रत्नांनी सजविलेले.
मृगमदामोदाङ्कितम् – कस्तूरीमिश्रित (चन्दन)

(पृष्ठ क्र. २५ वर)

नामसाधना सुरू केली, तरी ती सिद्ध होऊन फलद्रूप होण्यासाठी त्या साधनेची शेतीप्रमाणे उत्तम जोपासना झाली तरच त्यातून ईशकृपेचे (पारमार्थिक लाभाचे) म्हणजेच पर्यायाने शुद्ध-परमानंदाचे भरपूर पीक साधकाला मिळू शकते. अशा त्या साधनेच्या जोपासनेविषयी काही बोधवाक्ये.

१. बाह्यतः पूजेचे सर्व उपचार केले; पण मन मात्र विषयांतच अडकून राहिले, तर ती साधना व्यर्थ ठरते.

२. नामसाधना चालू असताना, मन निष्काम वृत्तीने भगवंतावर केंद्रित झाले असले पाहिजे. ते काममोहांनी ओढले जात नाही ना याबद्दल साधकाने नेहमी सावध राहिले पाहिजे. नाम प्रगत होऊन मिळालेल्या सिद्धींचा मोहसुद्धा परमार्थास घातक ठरतो.

३. ईशकृपेचा पाऊस जरी सगळीकडे सारखा पडला तरी ज्या शेतात मनाची माती शुद्ध असते व जेथे नामाची मशागत चांगली होते, तेथेच परमार्थाचे पीक उत्तम येते.

४. सत्संगानेच विषयांची ओढ कमी होऊन ईश्वरावरील प्रेम दृढ होते, म्हणून नामसाधेला सत्संगाची जोड हवी.

५.साधना चालू असताना आपल्या साधनेविषयीच निर्माण होणारा 'अहंकार' किंवा गर्व साधनेत मोठाच अडथळा होऊ शकतो.

६. आपल्याशी लोकांनी जसे वागावे असे वाटते, तसेच आपण लोकांशी वागावे, ही सदाचाराची सर्वांत सोपी व्याख्या आहे.

७. माणसाच्या मनात अभिमान शिरण्यास धन, सत्ता किंवा विद्वत्ता यांची गरज असते, असे मुळीच नाही. त्याला (माणसाला) सहज असलेली देहबुद्धीच अहंकाराला कारणीभूत असते.

८. देववृत्तीच्या माणसाला जरा-दुःख हेही परमार्थाचे साधन बनते.

९. कोणतीही अपेक्षा न ठेवता केलेले निःस्पृह प्रेमच देवाला आकर्षित करू शकते. उद्धवासारख्या ज्ञानी श्रेष्ठ भक्तालासुद्धा, भगवान श्रीकृष्ण, गांवढळ (अशिक्षित) गोपींच्या विशुद्ध, निःस्पृह प्रेमाचाच हवाला देतात.

१०. उपवासाचा खरा अर्थ, 'देवाजवळ वास' (राहणे) असा आहे. देवाजवळ वास म्हणजे देवाच्या चिंतनात राहणे. अतिभोजनाने जाड्य व बुद्धिमांद्य येते, म्हणून उपवासाच्या दिवशी अल्पाहार सांगितला आहे; पण म्हणून केवळ अल्पाहार किंवा अनशन म्हणजे उपवास होऊ शकत नाही.

११. खाल्ले किती यापेक्षा पचले किती हे जसे शरीरपोषणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते; तसेच वाचले किती यापेक्षा उमजले किती व आचरले किती हे परमार्थाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

खाण्यास काही मिनिटे, पचना परि तास ते।<br>
तैसे वाचन ते थोडे, मनन दीर्घ ते हवे ।।

१२. शिशुवृत्ती धरूनच देवाला शरण जाऊन समर्पित व्हावे, म्हणजे देव मातेप्रमाणेच आपल्या चुका पोटात घालून, आपण घसरत असताना आपल्याला सावरतो.

१३. अभिमानचि सोडून धरावे शिशुवृत्तिला ।
निष्पाप मन होताची द्रवे ईशकृपा तदा ।।

१४. आपले दोष आपल्याला दिसलेच नाहीत तर आपण ते सुधारणार तरी कसे? म्हणून अभिमान सोडून संपूर्ण शरणागतीने देवाला शरण जावे म्हणजे आपल्याला आपले दोष दिसू लागतील!

१५. आपली कीर्ती व्हावी, आपल्याला लोकांनी मान द्यावा अशा स्वार्थी हेतूंनी केलेली पुण्यकर्मे ही 'राजस' होत. त्यांनी ऐहिक लाभ झाला तरी परमार्थ साधत नाही.

१६. पिता ईशचि सर्वांचा, सर्व बंधूच आपले ।
ऐसे मानून वागावे सर्वांशी बन्धुभावानें ।।

१७. 'देह म्हणजे मी' असे आपण मानतो ते सर्वस्वी चूक आहे. देह म्हणजे देवाने आत्म्याला दिलेले परमार्थाचे साधन आहे.

१८. परमेश्वर हाचा माझा माता, धाता, पिता आणि सर्व काही आहे; प्रयत्न करणे माझ्या हातात, तर फळ मात्र त्याच्या हाती आहे असा दृढ विश्वास झाला की संसारातील भय, काळती आणि निराशा नाहीशा होतात.

१९. माणसाच्या आयुष्यात वयाप्रमाणे प्रेमकेंद्र बदलत असते. ईश्वरावर ते स्थिर झाल्याशिवाय केलेली यात्रा-व्रतवैकल्ये व्यर्थ होत.

२०. केले मोठे पूजापाठ ईश्वरीं नसता मन ।
गेले वाया विना-श्रद्धा, घडेना परमार्थच ।।

२१. असे देव नरा प्राप्य, नर तो अज्ञ हीन ही ।
लुटावे प्रेम त्याचेची, मातेचे मूल ज्यापरी ।।

२२. राम माझा स्वामी, माझा संसार हा त्याचाच संसार असून तो मी त्याचा सेवक म्हणून चालवीत आहे, असे मानल्यास दुःखे बाधत नाहीत व संसारही सुखाचा होतो.

२३. अत्यंत प्रेमाने, कळकळीने आणि देवापुढेसंपूर्ण शरणागतीच्या भावनेने नाम घेतले गेले तर परमेश्वराचे अस्तित्व सर्व ठिकाणी भासू लागते व त्याचा सहवासच लाभल्याचा आनंद मिळू लागतो.

२४. प्रारब्धनिर्मित संकटे कोणीही टाळू शकत नाही, म्हणून त्या संकटांना धीराने तोंड देण्यासाठी मला बलबुद्धी दे असेच देवाजवळ मागावे.

२५. प्रपंचात वागत असताना विषयांशी (इन्द्रियांचा) संग होणारच; परंतु मी ईश्वराचा आहे ही जाणीव निरंतर ठेवून, विषयांच्या आहारी न जाता त्यांनाच आपले दास बनविणे हीच खरी योगसाधना आहे व तोच खरा पुरुषार्थ आहे.

२६. विषयोपभोग घेत असताना नामस्मरण चालू ठेवले तर आपण विषयांच्या आहारी जात नाही. नामसाधनेत देहबुद्धी हरपणे (विसरणे) यालाच समाधी म्हणतात.

२७. स्वैर सुटलेला अग्नी अरण्येच्या अरण्ये भस्म करतो, पण तोच अग्नी नियंत्रित केला तर आपले अन्न शिजविण्याचे महत्कार्य करतो. त्याप्रमाणेच वासनाही नियंत्रित ठेवून त्या ईश्वराकडे वळविल्यास त्याच वासना परमार्थ घडवितात.

२८. जे लोक बुद्धी ईश्वराकडे वळवितात ते सज्जन होतात, जे बुद्धी ईश्वरापासून दूर नेतात (ईश्वराला विसरतात) ते दुर्जन होतात.

२९. 'मी कर्ता' या अहंकारी भावनेने, मान-सन्मानाच्या लालसेने किंवा दुसरा काही अंतर्हेतू मनात ठेवून केलेला उपकार राजस ठरतो व त्यामुळे तो परमार्थ साधू शकत नाही.

३०. अखंड स्मृति देवाची मी अकर्ता चि भावना।
असमाधान-रोगाला होई औषध सर्वथा।

३१. जे प्रारब्धसंकट पुढे चालून येते, ते समबुद्धीने झेलावे व पूर्वजन्मीचे कर्जच फेडतो आहोत या समाधानाच्या भावनेने त्याला सामोरे जाऊन ते आनंदाने संपवावे.

३२. नामस्मरणीं देवाच्या विसरे क्षणही निजा।
होई तो क्षण मुक्तीचा देवाला अर्पिता निजा।।

३३. 'मी अकर्ता' या भावनेने चालून आलेली नियत कर्मे, फलाशा संग सोडून कर्तव्यबुद्धीने करीत राहणे, म्हणजेच 'कर्मयोग' आचरणे होय.

३४. कोणत्याही वस्तुभोगाची इच्छा न ठेवता ईश्वरावर अनन्यभावे अकृत्रिम प्रेम करणे म्हणजेच खरा परमार्थ होय.

३५. ईश्वराशी अनुसंधान साधण्यासाठी केवळ सद्गुरूंचा वशिला उपयोगी पडत नाही, त्यासाठी सदाचाराचे पथ्य पाळून कष्टाची साधना स्वतःलाच करावी लागते.

३६. अहंकार पूर्णपणे बाजूला ठेवून अनन्य-भाव-श्रद्धेने गुरूकडे गेल्यासच त्याच्या उपदेशाचा पारमार्थिक लाभ भक्ताला मिळू शकतो.

३७. शरीरातील ज्वर नाहीसा झाल्याशिवाय ज्याप्रमाणे पुष्टिदायक आहार (टॉनिक) शरीरास पुष्ट किंवा सुदृढ बनवू शकत नाही, त्याचप्रमाणे मनातील द्वेष-मत्सरादी विचारांचा ज्वर नाहीसा झाल्याशिवाय नामसाधनेचे टॉनिक परमार्थ वृद्धिंगत करू शकत नाही.

३८. देवाशी अनुसंधान साधण्यामध्ये, देवाची माया व स्वतःची देहबुद्धी याच दोन गोष्टी आड येत असतात.

३९. यात्रा-व्रतवैकल्ये यांत बाह्योपचार महत्त्वाचे नाहीत. विश्वात एकच 'नित्य' जे परब्रह्म त्यात मन नेमित (एकाग्र) करणे, हा जो 'नित्यनेम' तोच कोणत्याही साधनेत महत्त्वाचा असतो.

४०. प्रापंचिकाने संसार चालविण्यासाठी लागणारे धन मिळविणे यात काहीच गैर नाही. अति धन-लोभाने, वाममार्गाने दुसऱ्यांना नाडून ते मिळविणे हे मात्र पाप आहे. चांगल्या मार्गाने स्वकष्टाने मिळविलेले धन परोपकरासाठी खर्च करणे म्हणजेच परमार्थ साधणारा खरा 'यज्ञ' होय.

४१. अंतर्यामी समाधान लाभू लागणे हीच परमार्थ प्रगत होत असल्याची खूण आहे. अंतर्यामी शांती-समाधान स्थिर होऊ लागणे हीच परमार्थ प्रगत झाल्याची खूण आहे.

४२. भोगती वनवासात कष्ट पांडव ते जरी।
राहिले भगवंताचे, समाधानीच ते तरी।।

४३. भगवंत मनीं नित्य जो अखंड स्मरे तया।
प्रपंची सुखशांतीही समाधान मिळे तया।

४४. विषय-भोगांनी, विषय-लालसा तृप्त न होता ती आणखी वाढतच जाते व ही अतृप्त वासनाच अखेर दुःखाला कारणीभूत होते. पारमार्थिक वृत्तीच ही वासना मारून समाधान देऊ शकते.

४५. साधनेची सुरुवात सगुणभक्तीने म्हणजे द्वैतानेच करावी लागते, पण ती भक्ती प्रगत झाल्यावर आपल्याला अद्वैताकडे म्हणजे निर्गुणाकडे आपोआप घेऊन जाते.

४६. जे वस्तुभोगांच्या मागे लागले त्यांना शेवटी दुःखच वाट्यास येते. ईश्वराशी ज्यांचे अनुसंधान साधले त्यांनाच खरे समाधान प्राप्त होते.

४७. नियत कर्मे फलाशासंग सोडून कर्तव्यबुद्धीने, सर्व बलबुद्धी पणाला लावून ईश्वरार्पण बुद्धीने केली, तर ती कर्मे प्रपंचात व परमार्थात दोन्हीकडे उत्तम फळे देतात.

४८. नाम निरंतर मुखातून येऊ लागले व त्यात प्रेम आले की भगवंताच्या सहवासाचा अनुभव येऊ लागतो, त्यालाच अनुसंधान म्हणतात.

४९. सध्या आम्ही संसारात व्यग्र असल्यामुळे आम्हांला परमार्थ करणे शक्य होत नाही; निवृत्तीनंतरच आम्ही तो करू असे म्हणणे अगदी चुकीचे आहे. प्रपंच हेच खरे परमार्थाचे साधन आहे. प्रपंचात कार्यशील असतानाच परमार्थाचा पाया घातला तरच निवृत्तीनंतरही आपल्या हातून परमार्थमार्गावर प्रगती होऊ शकेल.

५०. साधना कशी करावी हे संत सांगतात, ती सिद्ध होण्यासाठी कोणती पथ्ये पाळावी हेही ते सांगतात; पण (अभ्यासाने) साधनेचे कष्ट उपसणे, हे दायित्व मात्र आपल्यावरच असते.

५१. निरोगी स्वस्थ शरीर जेवढे प्रपंचात आवश्यक तेवढेच ते परमार्थालाही आवश्यक असते. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्।' (कालिदास)

५२. प्रपंचात फार कामासक्ती ठेवू नये, पण प्रापंचिक नियत कर्मे मात्र ईश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेवून प्रेमाने बलबुद्धी पणाला लावून करावी. म्हणजे परमार्थ आपोआपच घडतो.

५३. स्वतःच्या उपभोगासाठी वस्तुसंग्रह करण्यात चिर-सुख नाही. परंतु त्या वस्तूंचा त्याग करून त्यांचा लोकहितासाठी वापर करण्यातच खरे चिर-सुख दडलेले असते.

५४. परमार्थ साध्य होण्यास कृती शुद्ध हवी, कृती शुद्ध होण्यास मती शुद्ध हवी आणि मती शुद्ध होण्यास नामाचे औषध हवे.

५५. ज्ञान पवित्र असले तरी त्याला शुद्धबुद्धीची जोड मिळाली तरच परमार्थ साधतो. वेदविद् शिवभक्त रावणाची बुद्धी बिघडली (त्याला दुर्बुद्धी झाली) आणि त्याचा सर्वनाशच झाला.

५६. संतांचे वाङ्मय वाचून त्याचे मनन केले तरच ज्ञान होते व ते ज्ञान कृतीत आले तरच परमार्थ साधतो.

५७. कोणत्याही योगसाधनेला शुद्ध मन अत्यंत आवश्यक असते. मनात द्वेष-मत्सरादी विकार शिरून ते अमंगळ होऊ नये, म्हणून त्याला सदाचाराचे कुंपण घालावे लागते.

परमार्थ वृक्षरोपाला सदाचारचि कुंपण।
ठेवण्या दूर तैसेची कामक्रोधरिपुगण।।

५८. अहंकाराची जाणीव दुजेपणचि जोंवर।
द्वेष मत्सर जाती ना, खरी भक्ती न तोंवर।।

५९. विषयांच्या प्रवाहात बुडायाचे नसे जर।
बांधूनी नामवृक्षाला ठेवावे मन ते स्थिर।।

६०. ईश्वराचे नामरूप चित्तात निरंतर वास करू लागले की द्वेष-मत्सरादी मनोविकार आणि अहंकार आपोआपच मावळू लागतात.

**प्र. सि. मराठे**

४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूज (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी- २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

## कवी कालिदासकृत मेघदूताचे आस्वादक रसग्रहण

**कृ.ज. दिवेकर**

ठाण्यामध्ये सध्या संस्कृतवर प्रेम व प्रभुत्व असलेल्या थोड्याच व्यक्ती आहेत. संस्कृतोपासक डॉ. श्रीराम भातखंडे व अलीकडच्या पिढीतील सौ. धनश्री लेले ही दोन नावे प्रामुख्याने घेता येतील. योगायोग असा की दि. १८ मार्च ते २१ मार्च २०१४ असा चार दिवसांचा कवी कालिदासकृत 'मेघदूत सोहळा' सहयोग मंदिरात संपन्न झाला. त्याला भातखंडे गुरुजी चार ही दिवस आवर्जून उपस्थित होते आणि धनश्री लेलेंचे रसाळ निरूपण ऐकतांना त्यांच्या मुद्रेवर कौतुकभाव वारंवार प्रकट होत होते, याहून धनश्रींच्या यश-गुणांची वेगळी पावती ती कोणती?

'धनश्री' नाव असले तरी त्या मुख्यतः 'विद्याश्री' आहेत. संस्कृतच्या त्या उच्चविद्याविभूषित आहेतच, पण आपल्या देवभाषेचा त्यांचा व्यासंग सखोल आहे आणि ईश्वरदत्त अमोघ वाणीने आपले विचार श्रोत्यांप्रत पोहोचविण्याचे त्यांचे कौशल्य वादातीत आहे. त्यांच्यापाशी जो ज्ञानसंचय आहे तो जणू 'ले ले' म्हणत श्रोत्यांना त्या भरभरून देतात व तृप्त करून सोडतात.

फार विस्तृत नसलेल्या तरीही वेगळ्या अर्थाने 'महा'काव्य असलेल्या मेघदूताचे धनश्रींनी चारही दिवस जे रसाळ व भावपूर्ण विवेचन केले त्यामुळे श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन गेले; अपवाद फक्त अधूनमधून होणाऱ्या? 'वा! वा!' चा आणि टाळ्यांचा! मेघाप्रमाणेच श्रोतेही त्याच्या प्रवासाबरोबर तन्मयतेने जणू त्याच्यासोबत विहार करीत असल्याचा भास होत होता. प्रसंगानुरूप कविवर्य बोरकर व शांताबाई शेळके यांच्या मराठी अनुवादाच्या पंक्ती उद्‌धृत करून धनश्री त्यांच्या निवेदनात गोडवा निर्माण करीत, त्याचाही प्रभाव श्रोत्यांवर पडत होता. बाजूच्या रुपेरी पडद्यावर प्रत्येक श्लोक व अर्थवाही चित्रे दाखविण्याचे आयोजकांचे औचित्य वाखाणण्यासारखे होते. डॉ. विजय बेडेकर, श्री. मा. य. गोखले व श्री. उत्तम जोशी यांची समयमर्यादा पाळून केलेली निवेदनेही प्रसंगोचित होती. आपल्या प्राचीन ग्रंथांपैकी सर्वांत जास्त भाष्ये ज्यावर झाली असे दोनच ग्रंथ - एक भगवत्‌गीता व दुसरे मेघदूत, ही धनश्रींनी दिलेली माहिती नव्यानेच समजली. 'मेघदूत'च्या वाङ्‌यज्ञाची भावपूर्ण सांगता धनश्रींनी केल्यावर सभागृहात टाळ्यांचा जो कडकडाट झाला तो थांबता थांबेना व थांबू नये असेही वाटले.

आश्चर्य याचे वाटते की, हा काही गायन-वादनाचा मनोरंजनात्मक कार्यक्रम नव्हता, तर बौद्धिक व भावनिक होता. पण चार दिवसांच्या कार्यक्रमात सभागृह खचाखच भरलेले होते व श्रोतेही फक्त बुजुर्ग नव्हते तर प्रामुख्याने प्रौढ, तरुण व विद्यार्थी होते. साधारणतः असा समज आहे की व्याख्यान, प्रवचन, निरूपण अशा कार्यक्रमांना श्रोत्यांची वानवा असते. ते खरेही आहे. परंतु धनश्री लेले यांच्यासारखे अभ्यासू व अभिजात वक्ते असले की वरील प्रवादाचा तो अपवाद ठरतो.

धनश्रींच्या मेघदूत प्रवासवर्णनामुळे, अधिक सविस्तरपणे मूळच्या संस्कृत काव्याचे पुनःपुन्हा वाचन, मनन व चिंतन करण्याची ईर्षा श्रोत्यांच्या मनात निर्माण झाली तरच ते या कार्यक्रमाचे सर्वोत्तम फलित ठरेल.

'सद्धर्म प्रकाशन' यांच्या विद्यमाने प्रस्तुत कार्यक्रमाचे आयोजन झाले व त्यासाठी 'ठाणे भारत सहकारी बँक' प्रायोजक म्हणून लागभली. सद्धर्म संस्थेतर्फे 'सद्धर्म त्रैमासिक' गेली ४९ वर्षे प्रकाशित होत असून त्यातून सद्‌विचारांचा प्रचार व प्रसार केला जातो. ठाणे भारत सहकारी बँकही सामाजिक बांधीलकी मानते व जपते. बँकेने धनवर्धनाप्रमाणे वनसंवर्धनाचाही वसा घेतला आहे. त्याला जोडून ज्ञानसंवर्धनही व्हावे या हेतूने, याआधी शंकर अभ्यंकर यांची प्रवचने आयोजित केली होती. या वेळी बँकेने मेघदूत कार्यक्रमाला सक्रिय योगदान दिले. बँकेतर्फे केले जाणारे उपक्रम प्रशंसनीय आहेत.

**कृ.ज. दिवेकर**
**ठाणे**

●●●

## श्रद्धा असेल तर...

नारायणाच्या शोधात असलेल्या एका माणसाला 'नारायण पाण्यात असतो' असे कोणी सांगितल्यावरून तो समुद्रकाठी आला आणि गुडघाभर पाण्यात उभे राहून, आपल्या हातातील पोहऱ्याने समुद्राचे पाणी भराभर बाहेर फेकू लागला. पाणी पुन्हा समुद्रातच परत येत होते. पण तिकडे त्याचे लक्षही नव्हते.

त्यावेळी समुद्रावर सहल करीत असलेला एक पंडित तेथे आला आणि त्याने त्या माणसाचा तो उद्योग पाहून त्याला म्हटले, ''भल्या माणसा, तू हे काय आरंभलं आहेस?''

तो माणूस पाणी काढून बाहेर फेकण्यांत इतका मग्न झाला होता, कीं त्याला त्या पंडिताचे म्हणणें ऐकूही आले नाही.

तेंव्हा पंडिताने त्याच्या अगदी जवळ येऊन, त्याला पुन्हा तोच प्रश्न केला.

तो ऐकून त्या माणसाने आपला उद्योग चालू ठेवूनच त्याला उत्तर दिले, ''पाण्यात परमेश्वर निजलेला आहे असं म्हणतात. मी त्याला शोधून काढीत आहे.''

त्याचे हे उत्तर ऐकून पंडिताला हसू आले आणि तो त्या माणसाला म्हणाला, ''शहाण्या सारा जन्म जरी असं पाणी उपशीत बसलास, तरी समुद्र कोरडा व्हायचा नाही आणि त्यातला नारायणही तुला दिसायचा नाही. सोड हा उद्योग.''

आपले काम तसेच चालू ठेवून त्या माणसाने पंडिताला उत्तर दिले, ''स्वामी, श्रद्धा असेल, तर तो पाहा, समोर दुसरा एक पोहरा पडला आहे, तो हाती घ्या आणि पाणी उपसायला मदत करा. नसेल, तर आपला मार्ग धरा पाहूं. कोरडा उपदेश करण्यात आपला आणि माझा वेळ व्यर्थ दवडू नका. आपल्या कामाला लागा.''

(नार म्हणजे पाणी, त्यांत 'अयन' म्हणजे स्थान आहे ज्याचे, तो नारायण. - मनुस्मृति १.१०)

(सद्धर्म त्रैमासिक कै.ह.ज.दामले स्मृति विशेषांकातून)

**‘गोपाळकाला’ – जाती अचलगति**

या मित्रांनो लवकर या
झटपट लगबग सारे या
आज वनी या खेळू या
आनंदाने गाऊ या
खेळाच्या
पाव्याच्या
नादाने
ही राने
भारून आपण टाकू या
तर मग धावत सारे या
या ग्वालांनो या रे या
मिळून सारे नाचू या ।।१।।
कूजति पक्षी मधुर किती
निर्झर तोषे खळखळती
गाइवासरे हंबरती
आनंदा ये मग भरती
वेचावे सृष्टिसवे
क्षण गहिरे मोदभरे
रुसवे फुगवे टाकुनिया
साऱ्या चिंता सोडुन या
या माझ्या अवघ्यांनो या
निर्भय आनंदा लुटण्या।।२।।
सूर्य कासरा वर चढता
खेळ खेळुनी मग दमता
पाहुन वृक्षाची छाया
निववू या शिणली काया
मग अपुले दहिपिठले
जमवूनी गर्द वनी
परस्परांना वाटू या
कवळ प्रीतिचे भरवू या
सवंगड्यांनो या रे या
करण्या या प्रभुच्या कार्या ।।३।।

वृंदावनात सारे स्थिरस्थावर झाले. बलराम आणि कृष्ण आता गोपकुळातील रितीप्रमाणे वनात गाई चरायला नेण्याइतपत मोठेही झाले. एक चांगला मुहूर्त पाहून नंदाने त्यांना गाईंबरोबर वनात धाडण्याची योजना आखली.

त्या दिवशी यशोदेनं त्यांना अभ्यंग स्नान घातलं. चांगली वस्त्रं नेसवली. स्वतः दहीभात भरवला. तोवर पेंद्या, वाकड्या, वडज्या वगैरे बालमित्रांचा गोतावळा नंदाच्या वाड्यावर जमा झाला होता. रामकृष्णांना निघायची घाई करत होता.

त्यांना निरोप देताना दाटून आलेल्या कंठानं यशोदा म्हणाली, बाळांनो, स्वतःच्या जिवाला जपून असा बरं. वनात काटेकुटे असतात, विंचू, साप असतात, इकडेतिकडे बघत चालू नका. वन्य श्वापदांच्या मागे जाऊन त्यांची कळ काढू नका, त्यांना त्यांच्या मार्गानं जाऊ द्या नाहीतर उलटायची एखाद्या वेळी. आपापल्या गाईगुरांवर नीट लक्ष असू द्या नाहीतर खेळात भरकटाल. खेळताना झाडांवरून, दरडींवरून उड्या मारू नका, उन्हात फार काळ राहू नका, एकमेकांशी भांडणं, मारामारी करू नका, वेळच्या वेळी जेवा, सगळी शिदोरी नीट खा नाहीतर खेळण्याच्या नादात अर्धवट जेवाल! रानातली दिसतील ती

फळंमुळं खाऊ नका, नेमकं एखादं विषारी बिषारी असायचं, वेळच्या वेळी गुरांना पाणी द्या, आणि हो, फार यमुनेच्या पात्रात शिरू नका, अचानक कुठे खोली असते, भोवरे असतात, पाण्याला कमीजास्त जोर असतो. संध्याकाळी येताना फार अंधार पडायच्या आत घरी या. कृष्णा, तुझा पावा दिलाय बरं तुझ्याबरोबर. कमरेला नीट खोचून बांध तो नाहीतर दिवसभरात लक्ष नसताना पडेल कुठेतरी आणि हरवून बसशील. बलरामा, आपल्या धाकट्या भावाकडे नीट लक्ष ठेव बरं, तो जरा धांदरट आहे. की त्यापेक्षा असंच करता? तुम्ही आपले जाऊच नका बाई वनात!

याच्यावर मात्र कृष्ण फुरंगटून तिच्या गळ्यात पडून म्हणाला, हे काय गं आई? असं केलं तर आमचे सगळे मित्र आम्हांला भित्री भागुबाई म्हणून चिडवतील. आम्ही तू सांगितलेलं सगळं ऐकतो, जाऊ दे ना आम्हांला वनात गाईंबरोबर! अखेर मोठ्या कष्टानंच यशोदेनं त्यांना निरोप दिला.

वनात शिरताच सर्वांची मनं प्रसन्न झाली. गोवर्धन पर्वताच्या एका अंगाला गाई चरायला लावून सगळी जणं एका डेरेदार वृक्षाच्या छायेत जमली. पेंद्या म्हणाला, कान्होबा, तुझ्या आईनं आपल्याला कित्ती सांगितलं की हे करू नका रे, ते करू नका रे, इकडे जाऊ नका रे, तिकडे बघू नका रे! आता तूच सांग बरं आम्हांला, की आपण करायचं तरी काय?

त्यावर तो बालमुकुंद किंचितसं स्मितहास्य करत म्हणाला, आपण काय करायचं? गडे हो, ऐका तर...

**'रासक्रीडा' – वृत्त भुजंगप्रयात**

पडे चांदणे कार्तिकी पौर्णिमेचे
सुषुप्तीमधे व्यस्त वाडे जनांचे
अशा वेळि वृंदावनी नाद आला
म्हणे श्रीहरी खेळु या रासलीला ।।१।।

असे वृक्ष भांडीर वृंदावनी तो
उभा श्रीहरी बासरी वाजवीतो
सरा वीसरा क्षुद्र चिंता भवाला
म्हणे श्रीहरी खेळु या रासलीला ।।२।।

प्रभूने किती गोजिरी सृष्टि केली
तिला भोगण्या ज्योतही पालवीली
लुटा मुक्त निष्काम या वैभवाला
म्हणे श्रीहरी खेळु या रासलीला ।।३।।

करू गायना नर्तना ताल ठेऊ
भिजोनी प्रमोदे तदाकार होऊ
झणी या क्षणी सोडु या मीपणाला
म्हणे श्रीहरी खेळु या रासलीला ।।४।।

असे लंघिता या भवा सागराला
सुखे कर्म सत्कर्म येई फळाला
तरी सार्थकी लावु या जीवनाला
म्हणे श्रीहरी खेळु या रासलीला ।।५।।

कालचक्र भराभरा पुढे सरकत होतं. वृंदावनात गोप आता चांगलेच रुळले. रामकृष्णांची बाल्यावस्था संपून त्यांनी कौमार्यावस्थेत प्रवेश केला. मधल्या काळात कंसाचे कृष्णाला मारण्याचे प्रयत्न अविरत चालूच होते; पण अर्थातच कृष्णाच्या अद्भुत सामर्थ्यापुढे त्यानं केलेल्या एकाही प्रयत्नाला तिळमात्र यश आलं नाही. रामकृष्णांचा लोकसंग्रह, त्यांचा

वनविहार, आनंदाचं स्मरण आणि प्रक्षेपण अविरत चालूच होतं.

श्रीकृष्णाचं मुरलीवादन ही गोपांच्या मनोरंजनाची आणि कौतुकाची गोष्ट होऊन बसली होती. त्या वाद्यातून इतके सुरेल, श्रवणीय आणि दैवी स्वर त्यांनी आजमितीपर्यंत ऐकले नव्हते. त्या स्वरांची जादू एवढी होती की गोपांना हल्ली सायंकाळ झाल्यावर घरी परतण्यापूर्वी आपल्या गाई हाकारून गोळा कराव्या लागत नसत. कृष्णानं बासरी काढून वाजवायचा अवकाश की सारी गुरंवासरं स्वतःच त्या स्वरांकडे आकर्षिली जाऊन कृष्ण आणि इतर गुराख्यांभोवताली गोळा होत. त्या स्वरांची साथसंगत त्यांना मग अगदी वृंदावनात परतेपर्यंत लाभत असे. त्या स्वरांची मोहिनी मग सायंकाळी उशिरापर्यंत अखिल वृंदावनावर एक गूढतेचं आवरण बनून राहत असे.

कार्तिकी पौर्णिमा. आपल्या सर्व कलांनी विकसित झालेला चंद्र निरभ्र आकाशाची शोभा वाढवत होता. वृंदावनातल्या गाईंच्या दुधाशी स्पर्धा करेल असं टिपूर चांदणं पडलं होतं. दिवसभराची कामं करून वृंदावनवासी सुस्तावले होते. वाड्यावाड्यांतून रात्रीच्या स्वयंपाकाचा धूर गगनांतरी लुप्त होऊनही थोडा काळ लोटला होता. घराघरातली हालचाल मंदावली होती. पेंगुळलेल्या डोळ्यांनी लहानगी आपल्या मातांच्या कुशीत शिरत होती. गोठ्यात आपल्या स्थानांवर बसून गोपांचं गोधन दिवसभर चरलेला सकस चारा शांतपणे रवंथ करू लागलं होतं. लवकरच आसमंत स्वतःला निद्रादेवीच्या अधीन करून टाकणार अशी चिन्हं दिसू लागली होती.

आणि अशा जागृती-सुषुप्तीच्या सीमारेषेवर सारे असतानाच ते मंजूळ स्वर दशदिशा भरभरून येऊ लागले. त्या स्वरांची जादू एवढी विलक्षण होती की ते थेट स्वर्गातून पृथ्वीतलावर अवतीर्ण होत आहेत की काय असा क्षणभर भास निर्माण झाला. आबालवृद्ध साऱ्याच वृंदावनवासीयांचं भान हरपल्यासारखं झालं. त्या स्वरांना ऐकण्यासाठी त्यांच्या जिवांचे कान झाले, त्यांची जणू ब्रह्मानंदी टाळी लागली.

किती पळ असे बेभान अवस्थेत व्यतीत झाले कोणालाच कळलं नाही. पण स्थळकाळाची शुद्ध कालांतरानं परत येताच त्यांच्या लक्षात आलं की ते स्वर वृंदावनातल्या भांडीर नावाच्या प्रचंड वृक्षतलापासून येत आहेत. हे लक्षात येताक्षणी होते त्या अवस्थेमध्ये वृंदावनातले सारेच त्या वृक्षाच्या दिशेनं धावत सुटले. काही अवधीतच सारंच गोकुळ त्या वृक्षाच्या आजूबाजूला गोळा झालं.

तिथे त्यांना दिसून आलं की त्या पिंपळाच्या खाली पायावर पाय दुमडलेल्या आसनात उभा राहून, दोन्ही हातांत मुरली उचलून ती ओठांना लावून, स्वतःचे नुकत्याच उमललेल्या कमलांनाही लाजविणारे नयन अर्धोन्मीलित करून त्यांचा अत्यंत लाडका श्रीकृष्ण ते दिव्य संगीत निर्माण करतोय...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

## अध्याय १७ वा : श्रद्धात्रय विभाग योग

श्रद्धा, आहार, तप, यज्ञ, दान। प्रत्येकाचे प्रकार तीन तीन।। ॐ तत् आणि सत् चे महिमान। श्रद्धात्रय विभाग सतरावा।।

**अर्जुनाची शंका :**

शास्त्रविधी न पाळती। परी श्रद्धेने यजन करिती।। कोणती मानावी निष्ठा ती। सात्त्विक, राजस, तामस।।१।।

**श्रीभगवंतांचे विवरण :**

श्रद्धेचे प्रकार तीन असती। सात्त्विक, राजस, तामस इति।। प्राण्यांची ती स्वाभाविक वृत्ती। त्यांची लक्षणे ऐक आता।।२।।

श्रद्धामय ह्या मानव जाती। जैसी श्रद्धा तैसे बनती।। अर्जुना, सर्वांच्या श्रद्धा असती। प्रकृति स्वभावानुसार।।३।।

सात्त्विक मानव देवांना पूजिती। यक्ष राक्षसांना राजस भजती।। भूत, प्रेत, पिशाचांप्रति। श्रद्धा ठेविती तामस।।४।।

ढोंगी, अहंकारी, लोभांत गुंतलेले। अतृप्त इच्छांनी भरलेले।। आसुरी प्रवृत्ती असलेले। तेही करिती घोर तप।। परंतु ते शास्त्रविहित नसते। जीवात्मा आणि पंचभूते।। ज्यांची वसती अंतरी असते। तयां होते कष्टदायी।।५-६।।

प्रत्येकाचे प्रिय अन्न सेवन। सवेच यज्ञ, तप आणि दान।। यांचेही प्रकार तीन तीन। ऐक सविस्तर सांगतो।।७।।

आयुष्य, बुद्धी, आरोग्य, सामर्थ्य। सुखप्रेमवर्धक टिकाऊ पदार्थ।। रसयुक्त स्निग्धान्न आहारार्थ। आवडते सात्त्विक लोकांना।।८।।

अतिगरम, कडू, आंबट, खारट। जळजळीत अन्न, शुष्क, तिखट।। दुःख, चिंता, रोगांचे सावट। आवड राजस लोकांची।।९।।

थंड, अपवित्र, रसरहित। शिळें, उष्टें, दुर्गंधिसहित।। असे पदार्थ आवडतात। तामसी वृत्तीच्या लोकांना।।१०।।

विधिपूर्वक आणि कर्तव्य समजून। यज्ञ करिती फलाशा सोडून।। ज्याने मनाला लाभे समाधान। सात्त्विक यज्ञ असे तो ।।११।।

लोकांनी मोठे म्हणावे म्हणून। फळ मिळण्याची आशा धरून।। जो यज्ञ अशा भावनेतून। तो समजावा राजसी।।१२।।

शास्त्रविधी नाही, अन्नदान नाही। मंत्र नाही, गुरुपूजनही नाही।। यज्ञासंबंधी श्रद्धा नाही। तो यज्ञ असे तामस।।१३।।

देव, ब्राह्मण, गुरुजन। आणि ज्ञानी जनांचे पूजन।। पावित्र्य, ब्रह्मचर्य, अहिंसा, सौजन्य। तपश्चर्या शरीराची।।१४।।

कोणालाही शब्दाने न दुखवावे। मधुर, हितकर, सत्य बोलावे।। वेदशास्त्रांचे अध्ययन करावे। तपश्चर्या वाणीची।।१५।।

मनाची प्रसन्नता, आध्यात्मिक प्रवृत्ती। मनोनिग्रह, सदैव मानसिक शांती।। पवित्र अंतःकरण, यांची युती। तपश्चर्या मनाची।।१६।

फलाशा सोडून, निरिच्छ वृत्तीने। तीन प्रकारांनी, परम श्रद्धेने।। केलेले कायावाचा मनाने। तप जाणावे सात्त्विक।।१७।।

मान, पूजन, सत्कार व्हावे। त्यासाठी तपश्चर्येचे ढोंग करावे।। तेही अनिश्चित, अस्थिर ठरावे। राजस नाव त्या तपा।।१८।।

हट्टाने शरीराला पीडा देती। मूर्खपणाने तपश्चर्या करिती।। इतरांचा नाश हा हेतू चित्ती। त्यास म्हणावे तामस।।१९।।

कर्तव्य भावनेने दाने देती। स्थळ, वेळ, व्यक्तीचा विचार करिती।। परत फेडीची अपेक्षा न ठेविती। त्यांचे दान सात्त्विक।।२०।।

काहीतरी लाभाच्या अपेक्षेने। अथवा निश्चित फळाच्या आशेने।। मनाची चलबिचल ज्या दानाने। त्याचे नाव राजस।।२१।।

चुकीच्या ठिकाणी, अवेळी केलेले। कुपात्र व्यक्तीला अनादराने दिलेले।। तिरस्काराने मन असे भरलेले। तामस म्हणावे त्या दाना।।२२।।

परब्रह्म तीन प्रकारे सांगती। ॐ तत् आणि सत् इति।। ब्राह्मणे, वेद, यज्ञांची निर्मिती। यांतूनच पूर्वी केली असे।।२३।।

म्हणून जे ब्रह्मवादी असती। ते विधियुक्त कर्मे करिती।। यज्ञ, दान, तपादि आचरती। त्यांचा आरंभ ॐकाराने।।२४।।

इच्छा ज्यांना आध्यात्मिक कल्याणाची। अपेक्षा ज्यांना नसे फलाची।। त्यांच्या यज्ञ तप दानाची। सुरुवात होते तत् शब्दाने ।।२५।।

जेथे असे सनातन सत्य। जे असे सर्वोत्तम नित्य।। जे कर्म सदा प्रशस्त। सत् शब्द योजिती त्यासाठी ।।२६।।

यज्ञ, दान, तप सतत करावे। त्यासाठीच कर्म करावे।। ही क्रिया आणि कर्म जाणावे। सत् शब्दाने अर्जुना।।२७।।

यज्ञ दान तप केले असे। परंतु त्यामागे श्रद्धा नसे।। ते सर्व असत्, त्याचा लाभ नसे। इहलोकीं वा परलोकीं।।२८।।

आचार विचार सात्त्विक असावे। शास्त्रानुसार तप आचरावे।। त्रिगुणानुसार त्यांचे भेद करावे। स्वाभाविक जे असतात।। आहार यज्ञ तप दानांचे। जाणावे स्वरूप त्यांच्या भेदांचे।। रहस्य ॐ तत् आणि सत्चे। श्रद्धात्रय विभाग योग समाप्त।।

।। **श्रीकृष्णार्पणमस्तु**।।

## अध्याय १८ वा : अर्जुनोत्थान योग

कर्ता, कर्म, सुख आणि दान। बुद्धि, धृति, प्रकार तीन तीन।। वर्णधर्म, निष्काम कर्म, गीता महिमान। मोक्षसंन्यास तो अठरावा।।२०।।

**अर्जुनाची शंका :**

संन्यास आणि त्याग यांचे ज्ञान। हे महाबाहो, सांग समजावून।। वेगवेगळे जाणण्याची इच्छा उपजून। विचारतो केशी दैत्यांतका।।१।।

**श्रीकृष्णांचे विवरण :**

इच्छिलेल्या कर्माच्या त्यागास। ज्ञानी म्हणती संन्यास।। सर्व कर्मफलांच्या त्यागास। त्याग म्हणती विवेकी।।२।।

कर्मे दोषयुक्त असती म्हणोनि। त्यागावी म्हणती विद्वान कोणी।। यज्ञ, दान, तपकर्म कोणी। सोडू नये म्हणतात।।३।।

त्यागासंबंधी प्रथम सांगतो। निश्चित निर्णय ऐकवतो ।। तीन प्रकारचा त्याग असतो। भरतश्रेष्ठा अर्जुना ।।४।।

यज्ञ, दान, तप आवश्यक। ती सोडणे आहे चूक।। पवित्र कर्मे ही आनंददायक। बुद्धिवंत पुरुषांनाही ।।५ ।।

ही कर्मे इतर कर्मांसहित। करावी आसक्ती फलाशारहित।। ऐसे माझे निश्चित मत। उत्तमही मानावे ।।६ ।।

कर्मे जी स्वधर्मविहित। त्यांचा त्याग नसे उचित ।। त्या त्यागाला तामस म्हणतात। मोहाने जर केला असे ।।७ ।।

सर्व कर्मांना दुःखरूप मानून। कष्ट टाळण्यासाठी त्यागून ।। राजस त्याचे नामाभिधान। त्याला नसे फलनिष्पती ।।८ ।।

करावी कर्मे स्वधर्म नियत। आचरावी ती शास्त्रविहित।। नसावी आसक्ति फलाशा त्यांत। सात्त्विक असतो त्याग हा ।।९ ।।

अकुशल कर्मांचा द्वेष नसे। कुशल कर्मात आसक्त नसे ।। सत्त्वशील, संशयरहित असे। त्यागी मानावा तो ज्ञानी ।।१० ।।

कारण देहधारी पुरुष। त्यागू न शके कर्म निःशेष ।। म्हणून त्यागी म्हणावे त्यास। कर्मफल त्यागी जो ।।११ ।।

इष्ट, अनिष्ट वा मिश्र फल। सकाम कर्त्याला मरणान्तीही मिळेल ।। कधीही कोठेही नसे फल। संन्याशाच्या कर्मांना ।।१२ ।।

कोणत्याही कर्माची होण्या पूर्ती। पाच कारणांची सुसंगती ।। सांख्य शास्त्रज्ञ जी सांगती। ती ऐक माझ्याकडून ।।१३ ।।

अधिष्ठान आणि करणारा। विविध साधनांचा पसारा ।। वेगवेगळे प्रयत्न करा। दैव पाचवे शेवटी ।।१४ ।।

मानव कार्याची करितो सुरुवात। धर्मानुसार वा विपरीत ।। शरीर, वाणी वा मनाने प्रेरित। पंच कारकें आवश्यक ही ।।१५ ।।

ही कारणे असतां आवश्यक। स्वतःलाच मानी कर्मांचा कारक। विचार त्याचा हा अज्ञानमूलक। तो मूर्ख असतो दुर्मति ।।१६ ।।

अहंभाव ज्याला नाही। बुद्धी नसे फलासक्तही।। तो या लोकांना मारूनही। नसे मारणारा, न कर्मबद्ध ।।१७ ।।

जाणणारा, विषय आणि ज्ञान। कर्मप्रवृत्ति उपजे यांतून ।। साधने, कर्म, कर्ता मिळून। कर्म केले जातसे ।।१८ ।।

कर्ता, कर्म आणि ज्ञान। यांचे गुणभेद तीन तीन ।। सांख्य शास्त्रांत याचे वर्णन। ध्यान देऊनि ऐकावे ।।१९ ।।

वेगवेगळ्या भूतमात्रांत। अविनाशी आत्मा विभागरहित ।। ज्यामुळे दिसतो एकरूपांत। सात्त्विक ज्ञान असते ते ।।२० ।।

ज्या ज्ञानाने भूतमात्र सारे। दिसून येते भिन्न प्रकारे ।। अलग भावाने वेगळ्या आकारे। ज्ञान असे ते राजस ।।२१ ।।

नाही कारण योग्य विचारही। अशा कार्यांत जे आसक्त राही ।। त्या तोकड्या ज्ञानास पाही। तामस ऐसे नाव असे ।।२२ ।।

फलप्राप्तीची इच्छा नसे। आसक्तिविना केले

असे ।। प्रीती, द्वेष ज्यांत नसे । ते कर्म सात्त्विक ।।२३ ।।

अहंकारी पुरुषांनी केलेले । फलप्राप्तीची इच्छा असलेले ।। परिश्रमांनी करावे लागलेले । ते कर्म राजस ।।२४ ।।

विचार न करिता परिणामांचा । नुकसान, हिंसा, सामर्थ्याचा ।। अविचाराने आरंभ ज्याचा । ते कर्म तामस ।।२५ ।।

अनासक्त निरहंकारी । उत्साहपूर्ण धैर्यधारी ।। यशापयशात निर्विकारी । कर्ता माना तो सात्त्विक ।।२६ ।।

लोभी, कर्मफलासक्त । अमंगल, हिसक, विषयासक्त ।। हर्ष शोकांत समचित्त । राजस माना तो कर्ता ।।२७ ।।

अस्थिर, अज्ञानी, गर्वयुक्त । फसवणारा, आळशी, कपटयुक्त ।। खिन्न, वेळकाढू सदोदित । असा कर्ता तो तामसी ।।२८ ।।

बुद्धी आणि धृति यांचे प्रकार । त्रिविध असती गुणानुसार ।। विभागून सांगतो सविस्तर । ऐक आतां अर्जुना ।।२९ ।।

भय अभय प्रवृत्ति निवृत्ति । कर्तव्य अकर्तव्य, बंधनमुक्ति ।। जी बुद्धी जाणते यथार्थ रीती । ती बुद्धी सात्त्विक ।।३० ।।

जिच्यामुळे धर्म अर्धमाचा अर्थ । कर्तव्य अकर्तव्यांचे ज्ञान यथार्थ ।। योग्य प्रकारें न कळे पार्थ । ती बुद्धी राजसी ।।३१ ।।

जिला तमोगुणाचे आवरण । अधर्माचे करी धार्मिकीकरण ।। सर्व विपरीत मानी प्रमाण । ती बुद्धी तामसी ।।३२ ।।

ध्यानाने, योगाने, साधना करून । एकनिष्ठ दृढ धारणा धरून ।। प्राण, मन, इंद्रिये धरी आवरून । ती धारणा सात्त्विकी ।।३३ ।।

धर्म, अर्थ, काम धारण करिते । जी कधी फलाशाही धरिते ।। ती धारणा राजस असते । कुंतिपुत्रा अर्जुना ।।३४ ।।

जिच्यामुळें निद्रा, खेद, भीती । दुःख आणि अहंकार यांची संगती ।। दुर्बुद्ध मानव सोडू न शकती । तामसी ती धारणा ।।३५ ।।

सुखाचेही ऐक प्रकार तीन । ज्यात रमते साधक मन ।। दुःखमुक्त होते साधना करून । आत्मबुद्धीच्या जागृतीने ।। आरंभी विषासारखे भासे । परिणामी असे अमृतासरसे ।। त्या सुखाला नाव असे । सात्त्विक ऐसे अर्जुना ।।३६-३७ ।।

संयोग होतां इंद्रियें विषयांचा । वाटे लाभ अमृततुल्य सुखाचा ।। विषसमान शेवट होतो ज्याचा । ते सुख असते राजस ।।३८ ।।

आरंभी, परिणामी, मोहक असते । झोप, आळस, चुकांमुळे होते ।। त्या सुखाला जाणती जाणते । तामस नावाने, अर्जुना ।।३९ ।।

प्रकृतिजन्य हे तीन गुण । मुक्त न कोणी त्यांच्यापासून ।। पृथ्वीवर, स्वर्गांत पाहावे शोधून । देवलोकीही कोणी नसे ।।४० ।।

कर्मे ब्राह्मण क्षत्रियांची । वैश्य आणि शूद्रांची ।। स्वाभाविक गुणांनुसार त्यांची । विभागणी केली असे ।।४१ ।।

मनोनिग्रह, तप, इंदियदमन । सौजन्य, पावित्र्य, अध्यात्मज्ञान ।। शांति, ईश्वरनिष्ठा, ईश्वरज्ञान । स्वाभाविक कर्मे ब्राह्मणांची ।।४२ ।।

शौर्य, दान, धैर्य, तेजस्विता। रणांगणी न भिणे, चतुरता।। प्रजांचा बनावे पालनकर्ता। स्वाभाविक कर्मे क्षत्रियाची।।४३।।

शेती, पशुपालन, सचोटीचा व्यापार। वैश्य वर्णाचा स्वाभाविक आचार।। सर्व वर्णांच्या सेवेचा भार। शूद्र वर्णावरी असे।।४४।।

जो स्वकर्मात गढून जातो। तो परमसिद्धी मिळवितो।। त्यासाठी काय करतो। ऐक आतां, अर्जुना।।४५।।

जो भूतमात्र उत्पन्न करितो। जो विश्व व्यापूनि राहतो।। त्याला स्वकर्मांनी जो पूजितो। त्याला मिळे परम सिद्धी।।४६।।

परधर्म जरी वाटे सुखकर। स्वधर्माचरण अधिक हितकर।। स्वभावानुसार करितां आचार। दोष न लागे त्यामुळे।।४७।।

स्वाभाविक कर्म न टाळावे। वाटे दोषयुक्त, तरी आचरावे।। कर्म असते दोषी स्वभावे। अग्नीभोवती धूर जैसा।।४८।।

इच्छा नुरल्या, आसक्ती सुटली। मनाला जिंकिले, फलाशा संपली।। त्याला निश्चित प्राप्त झाली। नैष्कर्म्य सिद्धी महान।।४९।।

ज्याला सकल सिद्धी मिळती। त्याला सर्वश्रेष्ठ ब्रह्मपद प्राप्ती।। ज्ञानाची जी अंतिम स्थिती। ऐक अर्जुना संक्षेपाने।।५०।।

शुद्ध बुद्धीने युक्त होऊन। धैर्याने स्वनियमन करून।। शब्दादि पंच विषय त्यागून। राग द्वेषही सोडिले।।५१।।

एकान्ती वास, मिताहार। ताब्यांत मन, वाणी, शरीर।। ध्यान योगी, वैराग्य प्रखर। ममत्वरहित जो असे।।

अहंकार, बल, दर्प सोडून। काम, क्रोध, संग्रह त्यागून।। पात्र होतो तो शांत होऊन। ब्रह्मस्वरूप होण्याला।।५२-५३।।

प्रसन्न चित्त, ब्रह्मस्वरूप यती। शोक न करिती, इच्छाही सोडती। सर्वांठायी समबुद्धी ठेवती। तेव्हा होती परमभक्त।।५४।।

भक्तीने माझे श्रेष्ठत्व जाणती। ईश्वरी तत्त्व समजून घेती।। जाणून तत्काळ लीन होती। माझ्या स्वरूपी भक्तीने।।५५।।

निष्काम योगी सर्व कर्मे करितो। माझ्या भक्तींत रममाण असतो।। माझ्या कृपेने तो प्राप्त होतो। अविनाशी परम पदाला।।५६।।

सर्व कर्मे मला अर्पण। करूनि घ्यावे मला जाणून।। समत्व बुद्धीचा आश्रय घेऊन। चित्त ठेवी माझे ठायी।।५७।।

माझे ठायी चित्त ठेवशील। कृपेने सर्व संकटे तरशील।। अहंकाराने हे न ऐकशील। जाशील विनाश मार्गाला।।५८।।

लढणार नाही हे अहंकाराने म्हणशील। तरीही तुला लढावे लागेल।। स्वाभाविक प्रवृत्ती उफाळून येईल। व्यर्थ ठरेल निश्चय तो।।५९।।

लढणार नाही म्हणतोस मोहाने। तरीही बद्ध स्वभाव कर्माने।। विवश होऊन प्रकृति प्रभावाने। इच्छा नाही ते करशील।।६०।।

ईश्वर सर्वांच्या हृदयी राहतो। सर्वांना कर्मानुसार फिरवितो। संसार यंत्राचे चक्र चालवितो। आपल्या मायेने अर्जुना।।६१।।

अनन्य भावाने शरण जाऊन। त्या ईश्वराची कृपा

संपादून ।। परमशांति, शाश्वत स्थान । लाभेल तुजला, अर्जुना ।।६२ ।।

हे सर्व अति गोपनीय ज्ञान । सांगितले तू माझा म्हणून ।। सांगोपांग विचार करून । योग्य वाटेल ते करावे ।।६३ ।।

सर्व गुह्यांतील गोपनीय वचन । परत ऐक ते हितकारक ज्ञान ।। माझा अतिप्रिय भक्त म्हणून । ऐक तू, मी सांगतो ।।६४ ।।

माझे ठायी मन, भक्त ,होऊन । नमोनि, करी भक्तीने पूजन ।। मजकडे येशील हे प्रतिज्ञावचन । प्रियतम असल्याने सांगतो ।।६५ ।।

सर्व धर्म द्यावे सोडून । यावे केवळ मलाच शरण ।। सर्व पापांतून मी मुक्त करीन । शोक सोडी आपुला ।।६६ ।।

ऐकण्याची इच्छा, तप, भक्ति नाही । मत्सर करिती जे माझाही ।। त्यांना सांगू नये कधीही । ज्ञान रहस्य ही गीता ।।६७ ।।

जो हे परम गुप्त ज्ञान । माझ्या भक्तांना करील कथन ।। त्याची माझ्यावरती भक्ती वाढून । अंती येईल मजकडे । ।६८ ।।

सर्व मानवांत त्याच्याहून । माझे प्रिय करणारा नसून ।। जगांत माझा त्याच्याहून । अधिक प्रिय कोणी नसे ।।६९ ।।

हा धर्ममय संवाद आपणातील । याचे जो नित्य अध्ययन करील ।। ज्ञानयज्ञचि तो मला वाटेल । आणि असे पूजा माझी ।।७० ।।

जो हे ऐकेल श्रद्धेने । दोषदृष्टिरहित भावनेने ।। पापमुक्त होईल श्रवणाने । पुण्यलोकी जाईल ।।७१ ।।

हे माझे बोधवचन अर्जुना । एकाग्रतेने तू ऐकलेस ना? ।। तुझी अज्ञानजन्य मोहभावना । समूळ झाली ना नष्ट? ।।७२ ।।

**अर्जुनाचे उत्तर :**

उमजले कर्तव्य, संपला मोह । तुझ्या कृपेने झालो निःसंदेह ।। अच्युता, आता करीन युद्ध । तुझ्या आदेशाप्रमाणे ।।७३ ।।

**संजय धृतराष्ट्राला सांगतो आहे :**

महात्मा वासुदेव आणि अर्जुन । यांचे रोमांचकारी संभाषण ।। अद्भुत आणि रहस्यपूर्ण । अशा प्रकारे मी ऐकिले ।।७४ ।।

अत्यंत गुप्त असे कर्म योगाचे ज्ञान । साक्षात योगेश्वर कृष्ण मुखांतून ।। व्यास कृपेने दिव्यशक्ति लाभून । प्रत्यक्ष मी ऐकिले ।।७५ ।।

केशव, अर्जुन यांचे संभाषण। अद्‌भुत आणि पावन।। पुनःपुन्हा त्याचे होते स्मरण । हर्ष होतो क्षणोक्षणी ।।७६ ।।

श्रीहरीचे अद्भुत रूप, राजन । पुनः पुनः त्याचे स्मरण होऊन ।। आश्चर्य उपजते चित्ती महान । वारंवार हर्ष होतो ।।७७ ।।

**जेथे योगेश्वर श्रीकृष्ण भगवान ।**
**जेथे गांडीव धनुष्यधारी अर्जुन ।।**
**लक्ष्मी, विजय, नीती, कल्याण ।**
**तेथेच असती, माझी मती ।।७८ ।।**

भौतिक विषय समजाविले । आध्यात्मिक ज्ञान सांगितले ।। विविध मार्ग उपदेशिले । भेदांसहित त्यांच्या त्यांच्या ।। अर्जुनाचे अज्ञान नष्ट केले । त्याला युद्धास्तव प्रवृत्त केले ।। कौरव पांडव युद्ध घडविले । अर्जुनोत्थान योग समाप्त ।।

**नाही प्रतिभा, नसे अनुभव।**
**सिद्ध झाला पटवर्धन वासुदेव।।**
**परशुरामसुत, नमून आदिदेव।**
**पालन करण्या आज्ञेचे।।**
**भगवद्गीता अध्याय अष्टादश।**
**भाषांतर करण्या झाला आदेश।।**
**त्याला दिधला ओवीचा वेष।**
**संपूर्ण झाले कृष्ण कृपें।।**

**।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।**


**वा. प. पटवर्धन**
द्वारा सौ. जया धनपाल शहा
ए -१/११, श्री महावीर नगर,
आयकॉन हास्पिटलसमोर, मानपाडा,
डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९८२०२९०४८५


## *मेघदूत कार्यक्रम संपन्न*

जानेवारी २०१४ च्या अंकात दिलेल्या निवेदनाप्रमाणे १८ ते २१ मार्च २०१४ रोजी मेघदूत- आस्वादक रसग्रहण हा सौ. धनश्री लेले यांचा कार्यक्रम सहयोग मंदिर, घंटाळी, ठाणे येथे संपन्न झाला. ह्या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व ठाणे भारत सहकारी बँक लि. (शेड्यूल्ड बँक) यांनी स्वीकारले होते. त्यामुळेच न्यासास हा कार्यक्रम आयोजित करणे सोपे व शक्य झाले.

ठाणे शहरात भित्तिपत्रके, विविध वृत्तपत्रांत जाहिरात व निवेदने दिली होती. परिणामी सरासरी ३५० ते ४०० मेघदूतप्रेमी रसिकजन सर्व दिवस उपस्थित होते. न्यास सर्व रसिकांचा व श्रोत्यांचा आभारी आहे.

न्यासाची ही संकल्पना व प्रयोग नावीन्यपूर्ण तर होताच, पण मिळालेला असा प्रतिसाद पाहता तो यशस्वी झाला हे नक्की. या प्रकारची नावीन्यपूर्ण संकल्पना व प्रयोग करण्याचा न्यासाचा उत्साह द्विगुणित झाला. या कार्यक्रमास एक अंध प्रेक्षक उपस्थित राहत होता. हे समजल्यानंतर आमचा आनंद अधिकच वाढला. समाजात कालिदास व त्याची काव्ये यांची आवड आजही मोठ्या प्रमाणात आहे हे याने सिद्ध होत आहे. या प्रकारचे अनेक विषय आहेत याची आम्हांला कल्पना आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट व सद्धर्म प्रकाशनचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. हे वर्ष संस्मणीय व्हावे असे आमचे प्रयत्न आहेत व आपला त्यात सहभाग असवा ही अपेक्षा आहे. आपल्या सर्व सूचना व कल्पनांचे स्वागत आहे.सद्धर्म वचकांनी आपल्या सूचना व कल्पना पाठवाव्यात अशी विनंती आहे. आपल्या योग्य आणि व्यवहार्य सूचना व कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा जरूर प्रयत्न करता येईल.

न्यास ठाणे येथे असल्याने कार्यक्रम ठाणे येथे करणे सहज शक्य झाले. हा कार्यक्रम अन्य शहरांतील व्यक्ती वा संस्था यांनी पुढाकार घेतल्यास प्रायोजकत्व मिळवून तो संयुक्तपणे महाराष्ट्रात इतर ठिकाणी करण्यास न्यासाची तयारी असेल.

त्यासाठी ज्यांना तो व्हावा असे वाटते त्यांना अशी विनंती आहे की अधिक माहितीसाठी त्यांनी न्यासाशी संपर्क साधावा. संपर्क: प्रकाश दीक्षित. दूरभाष : ०२२ २५७२००५ भ्रमणध्वनी : ०९८१९६९३१९५. Email id : dikprak@gmail.com

●●●

लेखांक – २

कौटिलीय अर्थशास्त्र हा अर्थशास्त्र – अर्थात राजनीतिविषयक एक परिपूर्ण ग्रंथ असला तरी अर्थशास्त्रविषयक संकल्पना, विचार फार प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या दिसतात.

अर्थशास्त्राचा इतिहास आणि परंपरा, अखिल मानवजातीचा आद्य ग्रंथ ऋग्वेदापासून पाहायला मिळतो. ऋग्वेदात 'ऋत' म्हणजे नैतिक विश्वनियमांची संकल्पना आहे. या ऋताचे म्हणजे वैश्विक नियमांचे नियमन वरुण ही देवता करते असा वैदिक आर्यांचा विश्वास होता. म्हणूनच वरुणाला 'राजा', 'सम्राट' असे म्हटले आहे. या नियमांचे नियंत्रण म्हणजे एका अर्थी कायदा व सुव्यवस्थेची अंमलबजावणीच होती. जो ऋताचे पालन करत नाही त्याला वरुण पाशांनी बद्ध करतो असेही म्हटले आहे. वरुणाच्या गुप्तहेरांचा निर्देशही ऋग्वेदात येतो. इंद्रदेवतेचाही योद्धा किंवा 'पुरभिद्'– शत्रूंची नगरे भग्न करणारा – असा उल्लेख येतो. विश्वमित्र–नदी यांच्या संवादसूक्तात सुदासराजाच्या विजयमोहिमेचे चित्र दिसते. तर संज्ञानसूक्तात एकसंध राष्ट्राची संकल्पना दिसते. ऋग्वेदकालीन आर्यांच्या विविध गटांची स्वतंत्र राज्यव्यवस्था होती. राजव्यवस्थेच्या दृष्टीने ग्राम (गाव), विश (वसाहत, जिल्हा), जन (विशांचा समूह), पुर (नगर) अशी व्यवस्था केलेली दिसते.

अथर्ववेदातही 'राजकर्माणि' हा सूक्तांचा गट राजा आणि राज्यव्यवस्था या विषयाशी निगडित आहे. राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळी करायच्या काही विधींचे वर्णन या सूक्तात दिसते. शत्रूंना परास्त करणारे अभिचार मंत्रही या वेदात सांगितले आहेत, जे कूटनीतीचे निदर्शक आहेत.

ब्राह्मणकाळात जेव्हा यज्ञसंस्थेचा विकास झाला तेव्हा राजसूय, वाजपेय, अश्वमेध इ. सम्राटपद आणि सार्वभौमत्व प्राप्त करण्यासाठी केले जाणारे यज्ञ, राज्यसंस्थेचा विकास आणि विस्तार दर्शवितात. अशा रितीने विविध राजकीय संकल्पना आणि संस्था अस्तित्वात असल्या तरी त्यांचे सुसूत्र विवेचन करणारे शास्त्र या काळापर्यंत अस्त्तित्वात आले नव्हते.

नंतर सूत्रकाळात धर्मशास्त्राचे अंग (घटक) म्हणून अर्थशास्त्राचा विचार होऊ लागला. आपस्तंब धर्मसूत्रात चार आश्रमांची कर्तव्ये सांगणाऱ्या, काहीसे कायद्याचे स्वरूप असणाऱ्या मनुस्मृती इ. धर्मशास्त्रविषयक स्मृतिग्रंथांत अनेक विषयांपैकी 'राजधर्म' म्हणजे राजाची कर्तव्ये हा विषय हाताळलेला दिसतो. अर्थशास्त्रविषयक सर्व महत्त्वांच्या विषयांचे येथे थोडक्यात विवेचन येते.

अर्थशास्त्र – अर्थात राजनीतिविषयक विचार – केवळ धर्मशास्त्राचाच भाग न राहता रामायण, महाभारतासारख्या ऐतिहासिक महाकाव्यांचाही भाग झाले. राजनैतिक आधिपत्यासाठी संघर्ष करणाऱ्या कौरवपांडवांची

कथा सांगताना, महाभारतात अनेक ठिकाणी राजनीतिविषयी तात्त्विक आणि शास्त्रीय चर्चा झालेली दिसते. विशेषतः महाभारतातील अनुशासन पर्व आणि शांतिपर्वात अंतर्गत राज्यव्यवस्था, कर-आकारणी, परराष्ट्रीय धोरणे, युद्धविषयक नियम इ. अर्थशास्त्राशी निगडित विषयांवर साधकबाधक चर्चा आणि शुक्र, पराशर, इंद्र इ. विद्वानांची मते मांडलेली आहेत. महाभारतापूर्वी झालेल्या या विद्वानांच्या मतांचा समन्वय साधलेला दिसतो. एकूणच महाभारतकाळात राजकारण आणि राजधर्म या विषयांना महत्त्व प्राप्त झाले. या काळात कौरवपांडवांचा तसेच इतर राज्यांमध्ये होणारा संघर्ष, आपले आधिपत्य टिकवण्यासाठी एकमेकांशी सुरू झालेली स्पर्धा यांमुळे राजकारणात कूटनीतीचा अवलंब होऊ लागला. धर्मशास्त्राच्या चौकटीत बसणाऱ्या राजधर्मापेक्षा, कूटनीतीचा अवलंब करणाऱ्या, धर्माची चौकट प्रसंगी ओलांडणाऱ्या अर्थशास्त्रावर आधारित राजधर्म प्रभावी ठरू लागला. अशा रितीने अर्थशास्त्र हे एक स्वतंत्र शास्त्र म्हणून मूळ धरू लागले. धर्मशास्त्रापासून वेगळे झाले.

धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्र यांमधील मूलभूत फरक असा की धर्मशास्त्रात ध्येयप्राप्ती करण्यासाठी अवलंबलेले मार्ग शुद्ध आणि कर्तव्यांच्या चौकटीला धरून असतात. तर अर्थशास्त्रात परिणामांना अधिक महत्त्व असते. ध्येय साध्य करण्यासाठी चोखाळलेले मार्ग शुद्ध असतातच असे नाही. येन केन प्रकारेण ईप्सित प्राप्त करणे अर्थशास्त्रात महत्त्वाचे असते.

एक स्वतंत्र शास्त्र म्हणून अर्थशास्त्र याच विषयावर आधारित स्वतंत्र, परिपूर्ण, युगप्रवर्तक असा, उपलब्ध अर्थशास्त्रविषयक ग्रंथांपैकी प्राचीनतम ग्रंथ म्हणजे कौटिल्याने रचलेला 'कौटिलीय अर्थशास्त्र' हा ग्रंथ. हा ग्रंथ मनुस्मृती आणि महाभारतकाळानंतर रचला गेला हे निश्चित कारण कौटिल्य आपल्या अर्थशास्त्रात मनू आणि कौणपदन्त म्हणजे भीष्माचार्यांच्या मताचा निर्देश करतो. कौटिल्याने ग्रंथाच्या आरंभी ज्यांना वंदन केले आहे ते शुक्राचार्य, राक्षसांचे गुरू आणि बृहस्पती म्हणजे देवांचे गुरू, हे राजनीतिप्रवीण आचार्य होते (नमः शुक्रबृहस्पतिभ्याम्।). ग्रंथाच्या सुरुवातीला कौटिल्य नम्रतेने नमूद करतो की त्याने अर्थशास्त्राची रचना, पूर्वी होऊन गेलेल्या आचार्यांच्या अर्थशास्त्रांचा समन्वय साधून केली आहे.

प्रत्यक्ष ग्रंथातही राजनीतिविषयक विविध विषय हाताळताना कौटिल्याने जागोजागी विविध आचार्यांची मते उद्धृत केली आहेत. आचार्यांची मते सांगताना तीन भिन्न भिन्न पद्धतींचा अवलंब कौटिल्याने केला आहे. १) काही ठिकाणी 'मानव', 'बार्हस्पत्य', 'औशनस' अशा प्रकारे अर्थशास्त्रीय शाखांचा (School's) उल्लेख आहे. यावरून सिद्ध होते की अर्थशास्त्राच्या अभ्यासाची परंपरा असणाऱ्या शाखा अस्तित्वात होत्या. २) काही वेळा कौटिल्य पूर्वाचार्यांच्या व्यक्तिगत नावांचा उल्लेख करतो जसे पिशुन, कौणपदन्त, वातव्याधी, भारद्वाज, बाहुदन्तीपुत्र ३) तर काही ठिकाणी पूर्वाचार्यांचा व्यक्तिगत नामनिर्देश न करता 'आचार्याः' असा एकत्रित, सामायिक स्वरूपात उल्लेख केलेला दिसतो. अशा प्रकारे अनेक विषयांबाबत मत मांडताना

पूर्वाचार्यांच्या मताचा परामर्श घेऊन नंतर कौटिल्य आपले मत व्यक्त करतो.

कौटिल्यानंतर झालेल्या, 'नीतिसार' हा ग्रंथ रचणाऱ्या कामंदकानेही कौटिल्याला वंदन करताना म्हटले आहे की अर्थशास्त्ररूपी महासागराचे (विचार) मंथन करून कौटिल्याने राजनीतिशास्त्ररूपी अमृत बाहेर काढले.

पूर्वीचे इतके अर्थशास्त्रज्ञ असताना कौटिल्याचेच इतके महत्त्व का असा प्रश्न निर्माण होतो. त्याचे उत्तर म्हणजे कौटिल्याने पूर्वाचार्यांची मते लक्षात घेऊन, ती जागोजागी उद्धृत करून त्यांचा आपल्या ग्रंथात अंतर्भाव केला आहे. काही वेळा कौटिल्य या मतांशी सहमत असतो, काही वेळा असहमत तर काही वेळेला आचार्यांच्या टोकाच्या भूमिकांचा सुवर्णमध्य तो साधतो. या पूर्वाचार्यांचे मूळ ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे, त्यांची मते जाणण्याचे कौटिलीय अर्थशास्त्र एक महत्त्वाचे साधन ठरत. अशा रितीने पूर्वाचार्यांच्या मताचा अंतर्भाव करणारा हा ग्रंथ सर्वसमावेशक, परिपूर्ण आणि त्याचबरोबर कौटिल्याच्या स्वतंत्र आणि परिणत प्रज्ञेचा आविष्कार करणारा आहे. त्यामुळेच अर्थशास्त्राच्या परंपरेत 'कौटिलीय अर्थशास्त्र' हा अनन्यसाधारण ग्रंथ आहे.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २,
रघुनाथ नगर, तीन हात नाका,
ठाणे ४०० ६०४
फोन नं. ०२२–२५८२६६५८
मोबाइल : ०९८२१४९२७५३

●●●

(पृष्ठ क्र. ६ वरून)

**सार्थ श्रीशङ्कराचार्यविरचिता श्रीशिवमानसपूजा ।.....**

जातीचम्पक बिल्वपत्ररचितम् – जाईचे फूल, चाफा, बेलाचे पान यांनी केलेली पुष्परचना.

**अन्वय** – हे देव, दयानिधे, पशुपते, मया हृत्कल्पितं रत्नैः आसनं, हिमजलैः स्नानं, नानारत्नविभूषितं दिव्याम्बरं, मृगमदामोदाङ्कितं चन्दनं, जातीचम्पकबिल्वपत्ररचितं, पुष्पं, च धूपं तथा दीपं गृह्यताम् ।

**भाषांतर** – हे देवा, दयेच्या सागरा, शंकरा, मी मनाने कल्पिलेले रत्नजडित आसन, थंड पाण्याचे स्नान, अनेक रत्नांनी सजविलेली स्वर्गीय वस्त्रे, कस्तूरीमिश्रित चंदन, जाई, चाफा, बेलाची पाने यांनी सजवलेला फुलांचा साज व फुले, धूप त्याचप्रमाणे दीप ह्यांचा स्वीकार करावा.

श्लोकातील वृत्त 'शार्दूलविक्रीडित'.

**लक्षण** – सूर्याश्वैर्यदि मः भजौ सतत गाः शार्दूलविक्रीडितम् । प्रत्येक पादात १९ अक्षरे व ७ गण असतात. चारही पाद सारखे असतात. म्हणून ह्याला समवृत्त म्हणतात.

**गण – म स ज स त त ग.**

**यति** – व्याख्येत सूर्य म्हणजे अंक १२ व अश्व म्हणजे अंक ७ म्हणून १२ व्या व ७ व्या शब्दावर यती असते.

इति शम् ।

**दि. दा. औटी**
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

''वन्ही तो चेतवावा रे, चेतवीताचि चेतितो'' हे खरे आहे, पण हे चेतविण्याचे काम करणे सोपे नव्हे. विज्ञानात लहानपणी शिकविलेला प्रयोग लक्षात असेल. भिंगाच्या साहाय्याने सूर्यकिरण एकत्रित करून कागदावर तो तेजस्वी बिंदू पाडला की, कागद पेट घेत असे. म्हणजे यात तीन गोष्टी आल्या. तेजस्वी सूर्यकिरण, भिंग व कागद आणि चौथी गोष्ट ते भिंग वापरणारा. हे झाले एका शास्त्रीय प्रयोगाचे, पण हेच एकत्रीकरण जेव्हा मानवी मनाच्या संदर्भात विचारात घेतले तर हे सहज लक्षात येईल की जीवनाच्या विविध अंगांत वा व्यवहारांत यशस्वी होण्यासाठी एकत्रीकरणच खरा उपाय आहे. पण हे एकत्रीकरण म्हणजे एकाग्रता असा याचा अर्थ या संदर्भात घेतला पाहिजे. एकाग्रता ही यशाची गुरुकिल्ली आहे, असे म्हणावे लागेल इतके या गुणाचे महत्त्व आहे. एकाग्रता म्हणजे काय? शब्दशः अर्थ एक-अग्रता. एका टोकावरचे लक्ष्य केंद्रीकरण.

एकाच लक्ष्यावर वा टोकावर केंद्रीभूत होणे म्हणजे एकाग्रता. ही एकाग्रता मनाच्या व्यापार/व्यवहार संदर्भात, शरीराच्या व्यवहार संदर्भात, साधन प्रयोगत्वाच्या संदर्भात, समाजाच्या संदर्भात व राष्ट्रीय, वैश्विक इ. अनेक संदर्भात वेगळ्या पातळीवरची असू शकते, नव्हे असावीच लागते. कारण साध्य, साधन व साधक या सर्व ठिकाणी विभिन्न असतात. एकाग्रता याचा व्यवहारी अर्थ एकाच ठिकाणी केंद्रीकरण असा ढोबळमानाने घेता येईल, ऊर्जेचे एकत्रीकरण, शक्तीचे एकत्रीकरण इ. सारख्या भौतिक गोष्टींचे एकत्रीकरण म्हणजे एकाग्रता नव्हे असे नाही; पण या लेखात मला एकाग्रता अभिप्रेत आहे ती मनाची वा चित्ताची ज्यामुळे मानव आपला, समाजाचा वा राष्ट्राचा उत्कर्ष करू शकेल. ''अचपळ मन माझे'' हे समर्थ रामदासांचे वचन मन किती चंचल आहे, ते स्थिर करणे किती कठीण आहे ते सांगून जाते. षड्रिपूंच्या जाळ्यात हे मन स्थिर ठेवणे व एकाग्र करणे किती कठीण आहे, हे आपण प्रत्यही अनुभवत असतोच. इंग्रजीत ज्याला CONCENTRATION म्हणतात ती ही एकाग्रता. एकाग्रता साधणे स्थळकाळपरत्वे तसेच शारीरिक व मानसिक परिस्थितीवरही अवलंबून असते तसेच ते व्यक्तीच्या इच्छाशक्तीवरही अवलंबून असते. प्रबळ इच्छाशक्तीच्या व्यक्ती एकाग्रता इतरांच्या मानाने लवकर साधू शकता. तर दुर्बल मनोवृत्तीचे हळवे लोक शारीरिकदृष्ट्या उत्तम असले तरी एकाग्रता साधू शकत नाहीत. भूत व भविष्य यांच्या हिंदोळ्यावर सतत झुलणारे मन वर्तमानकाळी स्थिर ठेवणे/एकाग्र करणे अतिशय कठीण आहे, पण असाध्य नाही. एकाग्रता ही यशाची गुरुकिल्ली आहे, असे म्हणण्याचे कारण इतर अनेक गोष्टी जरी यश मिळण्यास कारणीभूत ठरल्या आणि एकाग्रतेपुढे त्या

गौण नसल्या तरी प्रथम क्रमांकाच्या नाहीत. अग्रक्रमांकित आहे ती फक्त एकाग्रताच कारण तीच या इतर गोष्टी प्रयोगित करण्याची प्रेरणा आहे. कार्यकारकत्वाच्या शक्तींचे केंद्रीकरण अथवा समदिश वा समलक्ष्यानुवर्ती प्रवहन करण्याचे/होण्याचे कारकत्व एकाग्रतेवरच अवलंबित आहे. ''केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे'' ह्या उक्तीत आधी एकाग्रता केली पाहिजे हे अध्याहृत आहे असे मला वाटते.

आता ही एकाग्रता करणे म्हणजे काय? एक लक्षात ठेवण्याची गोष्ट अशी की एकाग्रता म्हणजे ध्यास नव्हे. ध्यास लागणे ही क्रिया एकाग्रतेपेक्षा वेगळी आहे. ध्यास म्हणजे एखाद्या गोष्टीची सतत प्राप्ती व्हावी म्हणून लागलेली हुरहुर वा ओढ. ही एक मनाची भावनावस्था आहे. ही एकाग्रता नव्हे. एकाग्रतेत शक्ती, इच्छा, प्रयत्न यांचे केंद्रीकरण असते तर ध्यास हा भावनाविष्कार आहे. त्यात प्रयत्न असतीलच असे नाही. ध्यास काही वेळा अधोगतीस वा मानसिक संतुलन विचलीकरणासही कारणीभूत होतो. उदा. एखाद्याला मृत्युसमयी कोणालातरी भेटण्याचा ध्यास म्हणजे तळमळ लागते, ही अवस्था एकाग्रता नाही कारण त्यात प्रयत्नवाद नसून इच्छावाद आहे. काही जण माझे हे मत अमान्य करतील, पण ते वैचारिक पृथकपण समरूप आणि सरूप यांतील फरक न कळण्याचे लक्षण आहे, असा माझा दावा आहे. असो. हा शब्दच्छल येथेच सोडून द्यावा असे वाटते कारण मूळ विषय सोडून दिल्यासारखे होईल.

योगशास्त्रामध्येसुद्धा एकाग्रतेला फार महत्त्व दिले आहे. योगासनात चित्त व इंद्रिय एकाग्रता यांना फार महत्त्वाचे स्थान आहे. ही एकाग्रता तपश्चरणात अत्यंत उच्च स्थानाची मानकरी आहे. मानवालाच या एकाग्रतेचे भान असते, ज्ञान असते, असे नाही तर प्राण्यांत व पक्ष्यांतही ह्या एकाग्रतेची जाणीव दिसून येते. ही निसर्गदत्त देणगी आहे त्यांना दिलेली. साधे बगळ्याचेच उदाहरण घ्या. एका पायावर तासन्तास पाण्यात उभे राहून जलप्रवाहावर अखंड लक्ष ठेवून मत्स्यवेध घेण्याची वृत्ती एकाग्रताच आहे. तसेच खंड्या पक्ष्याचे आहे. घारीचे उदाहरण घ्या. शिकारी पक्ष्यांचे घ्या. ही एकाग्रता त्यांच्याच जीवनराहणीचे निसर्गदत्त वरदान आहे. ध्येय भक्ष्यप्राप्ती हे समान आहे. वाघ किंवा सिंह टिपण साधून भक्ष्य पकडतात वा शिकार करतात. त्यातही एकाग्रतेचेच दर्शन घडते. ही निसर्गदत्त एकाग्रता त्यांना उपजत असते व ती बाल्यावथेत त्यांचे मातापिता त्यांची जोपासना करताना व जीवनाचे धडे देताना उजळतात.

एकाग्रता ही स्थळ-काळ-परिस्थितीवर अवलंबून असते असे मी वर म्हटले आहे. तेसुद्धा याच प्रसंगातून प्रत्ययास येईल. थोडा वेगळा आवाज, चाहूल लागली की पशुपक्ष्यांची एकाग्रता नष्ट होते व ते सावध होऊन अन्य पवित्रा

घेतात हे सहज लक्षात येते. याचे कारण एकाग्रतेच्या वेळी स्वतःची सुरक्षितता धोक्यात येऊ नये याची सावधानता त्यांनी अंगीकारलेली असते. सुरक्षेचे भान ठेवून साधलेली एकाग्रता असे तिचे वर्णन करता येईल. पण मानवाच्या बाबतीत ह्याबाबत तो बुद्धिमान असल्याने थोड्या वेगळ्या पातळीवर वेगळ्या दृष्टिकोनाचा विचार करावा लागेल. कारण मानवाची प्रगत अवस्था बुद्धीमुळे अखंड आकार घेत आहे / प्रगती करीत आहे. तसे पशुपक्ष्यांचे नाही त्यामुळे वर उल्लेखित भक्ष्यप्राप्तीची एकाग्रता एवढेच त्यांचे एकमेव जीवनध्येय असते. यापलीकडे त्यांचे काहीही ध्येय नसते.

मानवाचे जीवन अनंत समस्यांनी भरलेले असते. षड्रिपूंच्या जाळ्यातील चित्त व आशाआकांक्षा यांच्यात त्याचा जीवनाचा संग्राम रात्रंदिवस सुरू असतो. प्रतिदिनी धार्मिक, वांशिक, सांप्रदायिक, अनंत लाटांवर त्याची जीवननौका हेलकावत असते. ध्येयआकांक्षांचे क्षितिज गाठणे दुरापास्त होत जाते. क्षितिज काही वेळा धुक्याने दिसेनासे होते तर कधी मृगजळाचा भास होत असतो. एक चक्रव्यूह त्याच्याभोवती असतो.

''रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग, अंतर्बाह्य जग आणि मन'' ही अभंगपंक्ती काय दाखविते? मानवाचा जीवनसंग्राम जग व मन दोन्ही आघाड्यांवर अविरत सुरू असतो आणि येथेच यश-अपयश, लाभ-हानी इत्यादींपैकी एक त्याच्या वाट्याला येते. कधी लक्ष्य चुकते तर कधी नेम चुकतो आणि हळहळ पदरी पडते. तेव्हा या सगळ्यावर मात करून अचूक मर्मभेद करणे आवश्यक असते. मनोनिग्रह करणे ही एकाग्रता साधण्याची पायरी होय.

महाभारत अर्जुनाने पक्ष्याचा डोळा भेदल्याचे उदहारण हे एकाग्रतेचे उत्तम उदाहरण आहे. फक्त साध्यच त्याला दिसत होते आणि म्हणूनच तेथेच त्याची चित्तवृत्ती तो एकाग्र करू शकला. मत्स्यभेदाच्या वेळीही ही एकाग्रता त्याच्या उपयोगी पडली, हे दुसरे उदाहरण आहे. मी फार वर्षांपूर्वी अमृत मासिकात एक सुंदर गोष्ट या संदर्भात वाचली होती, ती येथे उद्धृत करतो. एका साधूच्या अंगात शिकाऱ्याचा नेम चुकून एक तीर घुसला व तो काढताना त्या साधूस असह्य वेदना होऊ लागल्या. त्यामुळे तीर काढावयाचा कसा याचे कोडे पडले. तेव्हा त्याचा एक भक्त म्हणाला की महाराज आपला ध्यानाचा नित्यक्रम चुकवीत नाहीत तेव्हा ते ध्यानाला बसले की तीर काढू या. त्याप्रमाणे साधू ध्यानस्थ बसल्यावर त्यांनी तीर काढला व जखमेवर मलमपट्टी केली. साधूची ध्यानातील एकाग्रता एवढी पराकोटीची होती की, त्याच्या चेहऱ्यावर कोणतेही वेदनेचे रूप तीर काढताना उमटले नाही मग मुखावटे साधा चीत्कार वा उद्गार कोठून येणार? याला म्हणतात एकाग्रता. इतर सर्व गोष्टींचा लय

झाल्याशिवाय हे साध्य होत नाही. तेव्हा एकाग्रता किती महत्त्वाची आहे ते कळते.

भास्कराचार्यांनी लीलावती ग्रंथ लिहिला तेव्हा त्यांना सुद्धा फक्त गणित हाच विषय ध्यानीमनीस्वप्नी होता, ही गोष्टही सर्वश्रुत आहेच. या सर्वांवरून एक लक्षात येईल की, ईप्सित मोठे वा लहान असो, एकाग्रतेने त्याचे फळ मिळणारच. एकाग्रता नसेल तर सर्व शून्य वा प्रसंगी विपरीतही फल पदरी पडते. सर्व लय एकदिशानुवर्ती होण्यानेच एकाग्रता साध्य होते.

योगमार्गातसुद्धा प्रत्येक चक्रावर ध्यान लावण्यास वा चित्त एकाग्र करण्यास सांगितले जाते ते यासाठीच. कुंडलिनी जागृती, षट्चक्र भेदन इ. प्रकारांत ही एकाग्रताच कार्यसिद्धी देते. म्हणजे ध्येय कोणतेही असो धार्मिक, योगिक इ.इ. एकाग्रतेशिवाय साध्य होणार नाही आणि भौतिक जीवनात तर ती पदोपदी लागते. साधे वाहन चालवतानाही. नाहीतर अपघात हा ठरलेलाच नशिबी. परीक्षेत, अभ्यासात एकाग्रता हवीच तशीच भक्तिमार्गातही. म्हणूनच भगवान श्रीकृष्णाने गीतेत ''सर्वधर्मान् परित्यज्य, मामेकं शरणं व्रज'' असे सांगितले आहे. भक्तिमार्गात ज्यांनी ही एकाग्रता साधली ते पराकोटीचे साधुसंत झाले. अक्षय अजरामर झाले. पूर्वी शब्दवेध हा शरसंधानाचा प्रकार म्हणजे एकाग्रता साधण्याचीच किमया होती.

पुष्कळदा आपण वाचतो की, काही जण ज्योतिध्यान, बिंदुध्यान इ. करतात ते याच प्रकारात मोडते. याच एकाग्रतेचा भौतिक गोष्टीत उपयोग करून प्रख्यात आर्किमिडीजने शत्रूंच्या जहाजांना आरशांद्वारे आग लावली होती. एकाग्रता म्हणजे प्रचंड शक्तिसंकलन वा चालन एका विशिष्ट दिशेने ध्येयाकडे होते. ते करण्यासाठी व्यत्ययकारी गोष्टी, प्रलोभने इ. वर मात करावी लागते व ते मनोनिग्रहानेच साध्य होते. या सर्व व्यत्ययकारी गोष्टी गाळाव्या / त्यागाव्याच. कधी भौतिक साधनांची मदत घेऊन तर कधी गुरुकृपेच्या आधारे. काही वेळा स्थळ, काळ, वेळ बदलवूनही हे साध्य होते आणि म्हणूनच लोक पूर्वी तपाचरणास वनात वा हिमालयात जात असत, यामागील रहस्य हेच आहे.

आता एकाग्रता साध्य करण्यास सर्वसाधारणतः काय करावे लागते ते संक्षेपाने पाहू या. विविध कार्यसिद्धीसाठी विविध प्रकारची एकाग्रता लागते तरीही सर्वसामान्यतः मूलःतत्त्वे सर्वत्र सारखीच आहेत.

१. ध्येय वा साध्य काय आहे ह्याचे निश्चितीकरण करणे.

२. साधने काय उपलब्ध आहेत याचा अंदाज निश्चित करणे.

३. आपली पात्रता वा क्षमता याची स्पष्ट जाणीव असणे.

४. परिस्थितीची पूर्ण कल्पना असणे.

५. सुविहित वा सुयोग्य मार्गदर्शनकारी कोणी आहे का याची कल्पना असणे.

६. उन्नतीसाठी ध्येय/साध्य खरोखरच आवश्यक आहे का इ. चा सम्यक विचार.

७. साध्याचे जीवनावर परिणाम काय होतील?

८. साध्य कितपत वैयक्तिक/सामाजिक/ राष्ट्रीय महत्त्वाचे आहे?

९. हे साध्य यापूर्वी कोणी मिळविले काय?

१०. साध्य आपल्या आटोक्यात आहे काय? क्षमता – आर्थिक, मानसिक इ.

११. कालापव्यय किती होईल याचा अंदाज.

एकाग्रता ही जीवनात दैनंदिन व्यवहारात एक जीवनप्रणालीचा भाग म्हणूनही उपयोगात आणणे अत्यावश्यक आहे. साधे वाहन चालवताना, चालताना, सावध एकाग्रता अत्यावश्यक आहे. कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये यांचा सुरेख मेळ म्हणजे एकाग्रता सिद्धी.

एकाग्रता एकदम साध्य होत नाही. ती अंगीकारून, अवलंबन निरंतर केल्यानेच स्थिर चिरंतन होते व पुढे इतकी अंगवळणी पडते की कोणत्याही परिस्थितीत ती साध्य होऊ लागते. परीक्षेत एकाग्रता केवढे उत्तम फळ देते ही अनुभवाची गोष्ट आहे. वैद्यकीय उपचारांमध्येही काही उपचारपद्धतीत एकाग्रतेचे तत्त्व उपचाराचा भाग म्हणून वापरले जाते. पाँडेचरी येथील अरविंदाश्रमातर्फे नेत्रविकारांवर काही चार्ट वापरतात. त्यांवर नेत्र स्थिर करून विशिष्ट पद्धतीने फिरविणे असते यामुळे दृष्टिपल्ला केंद्रित होतो व नेत्र सुधारतात असे ते म्हणतात. यात जे मर्म आहे ते एकाग्रतेचेच. अर्थात कोठे काय एकाग्र करावे याचे ज्ञान हवे न पेक्षा अयोग्य ठिकाणची एकाग्रता नुकसानीस कारण ठरते हे लक्षात घ्यावे. अशा वेळी दुष्परिणाम न व्हावे म्हणून काही माध्यमे वापरावी लागतात. उदा. वेल्डिंग करताना विशिष्ट काचेचे चष्मे, ग्रहण पाहताना विशिष्ट काच इ. इ. म्हणूनच वर जे ११ मुद्दे दिलेत त्यांत क्रमांक २ व ५ महत्त्वाची ठरणारी कलमे आहेत हे लक्षात घ्या. व्यक्तिपरत्वे एकाग्रता विभिन्न दर्जाची असू शकते तरीही त्या व्यक्तीसंदर्भात ती मोलाची ठरते हे समजणे अत्यावश्यक आहे.

वरील विवेचनावरून एकाग्रतेचे मोल लक्षात येईल. जीवनाच्या सर्व अंगांत, सर्व क्षेत्रांत 'एकाग्रता' साधावी लागते. आपणांस जमेल तेवढी ती साधावी, वाढवावी व उन्नती करावी. केल्याने होत आहे रे आधी (एकाग्रतेचे व्रत) केलेचि पाहिजे हे यासाठी लक्षात ठेवा. प्रयत्नांती एकाग्रता–एकाग्रतांती यश हे सूत्र अवलंबून जीवन यशस्वी करावे हे लिहून लेखसमाप्ती.

**वसंत गोडबोले**

१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),

पुणे – ४११०३०

भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

(मुखपृष्ठावरून) **संपादकीय**

आधारित होती. प्रस्थापिताला विस्थापित केल्याशिवाय ह्या नवीन विचारसरणीचे रोपटे तग धरणे कठीण होते. संस्कृतिभंजन हा या विचारसरणीच्या प्रसार, प्रचाराचा गाभा होता. श्री. नवाथे हे कट्टर साम्यवादी होते. तत्कालीन साम्यवादी चळवळीला त्यांचा सक्रिय पाठिंबा होता. भारतामध्येही हा साम्यवाद रुजवायचा असेल तर तेथील सांस्कृतिक पाळेमुळे खणून काढणे गरजेचे होते. इतिहासाला आपल्या सोयीप्रमाणे वळवणे आवश्यक होते. साहजिकच प्रस्थापित राजे असोत अथवा विद्वज्जन असोत, हे सगळ्या समाजाची पिळवणूकच करत होते, या अंगानेच हा सगळा इतिहास लिहिला जाऊ लागला. रामायण, महाभारतापासून धर्मशास्त्रापर्यंत आणि साहित्यापासून सर्व कलांची निर्मितीसुद्धा समाजशोषणाकरता केली गेली, असे अनैतिहासिक, अनैसर्गिक जावईशोधही संशोधनाच्या वेष्टनात बांधून सादर केले गेले. कुठल्याही सभ्यतेमध्ये चांगल्या आणि वाईट गोष्टी असतातच. सभ्यतेचा 'पट' जेव्हा रुंदावतो, तेव्हा अनेक यशापयशाची शिखरे येऊन गेलेली असतात. या सगळ्या उलथापालथीमध्ये 'नित्य' आणि 'शाश्वत' तेवढे टिकून राहते. पण संस्कृतिभंजनामध्ये अशा मूल्यांनाही 'उद्ध्वस्त' केले जाते. भारत हा साम्यवादी देश जरी नसला तरी भारताच्या इतिहासलेखनामध्ये आणि समाजघडणीमध्ये या साम्यवादी विचारसरणीचा मोठा हातभार लागला आहे.

म्हणून श्री. नवाथे यांचा जीवनपट आणि त्यांनी चालू केलेल्या 'सद्धर्म' त्रैमासिकाला विशेष महत्त्व आहे. श्री. नवाथे यांचा 'साम्यवादी' विचारसरणी आणि 'प्रचारतंत्र' यांबाबतीत लवकरच भ्रमनिरास झाला. वैदिक आणि भारतीय संस्कृतीचा त्यांनी स्वतः सखोल अभ्यास केला. भारतीय संस्कृती, त्यावर आधारलेली भारतीय जीवनशैली आणि त्यातूनच निर्माण झालेले साहित्य नि धर्मसंकल्पना यांची उंची व खोली बघून ते विस्मयचकित झाले. त्या विचारामधील शाश्वत आणि सनातन सत्य त्यांना अधिक प्रेरणादायी वाटू लागले. व्रतवैकल्ये आणि पोथ्या यांच्या वाङ्मयाची सामाजिक गरजही त्यांच्या लक्षात आली. म्हणूनच सद्धर्म प्रकाशनातर्फे त्यांनी अनेक स्तोत्रे प्रकाशित केली. प्रत्येक 'समाजाला' आणि 'व्यवस्थेला' सुधारण्याची आवश्यकता असते. प्रत्येक शतकामध्ये अशा प्रकारचे झालेले प्रयत्न आपण बघतो. जेव्हा असे प्रयत्न एका 'विवेकी' आणि खऱ्याखुऱ्या 'निरपेक्ष' नेतृत्वाकडून होतात तेव्हा मूळ व्यवस्थेवर आलेली 'जळमटे' व 'पुटे' दूर होतात आणि सामाजिक संतुलन टिकून राहते. आगरकर, टिळक, गोखले, रानडे आणि सावरकर या सगळ्यांनाच धर्माची 'शाश्वत' तत्त्वे नष्ट न करता धर्मसुधारणा हवी होती. अर्जुनाला कार्यप्रवृत्त करण्याकरता गीता ही वारंवार सांगावीच लागते. भारताच्या इतिहासात अनेक आचार्य आणि संतपरंपरेने हेच कार्य केलेले आपण बघतो. श्री. नवाथे यांची 'सद्धर्म' त्रैमासिक चालू करण्यामागील प्रेरणा ही या समाजाला भारतीय वैचारिक साहित्याची ओळख करून देण्याची आहे, आणि तेच मार्गदर्शक तत्त्व गेली ५० वर्षे 'सद्धर्म' त्रैमासिकाने कटाक्षाने पाळले आहे.

श्री. नवाथे यांनी शेवटी संपूर्ण निवृत्ती घेतली होती. आपला चांगला व्यवसाय त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना देऊन टाकला. सद्धर्माकरता त्यांनी

'गुंडोपंत हरिभक्त' हे टोपणनाव घेतले. सद्धर्मकरता आपल्या पत्नीच्या नावाने न्यास चालू करून त्याच्या खर्चाची सोय करून ठेवली. आपले नाव कुठेही राहणार नाही याची त्यांनी इतकी खबरदारी घेतली की आपल्या पारपत्रावरील छायाचित्रही त्यांनी काढून टाकले होते.

भारतीय संस्कृतीमधील सणांचे, दहिहंडीपासून गणपती उत्सवापर्यंतचे राजकारण्यांनी केलेले विकृतिकरण आज आपण अनुभवत आहोत. राजकारणातील 'कुटुंबशाही' आणि 'नाममाहात्म्य' बघून समाजाला आज उबग आला आहे. निवृत्ती तर सोडाच, पण ज्येष्ठांचा सत्तेचा हव्यास सगळ्यांना स्तंभित करणारा आहे. या पार्श्वभूमीवर श्री. नवाथे यांचे उदाहरण नक्कीच अनुकरणीय आहे.

अशा विचारांना वाहून घेतलेल्या नियतकालिकांना आज वाचक मिळणे कठीण असतानाही, सद्धर्मची कुठलीही जाहिरात न करता आज १३०० वर्गणीदार आहेत व रोज त्यांमध्ये नव्याने भर पडत आहे. श्री. नवाथे यांच्या कार्याला वाचकांची ही पावतीच आहे आणि सद्धर्म चालू राहण्याकरता ती प्रेरणादायी ऊर्जाही आहे. संवाद हे आत्मपरीक्षणाचे एक प्रभावी साधन आहे. सद्धर्ममधील लिखाणाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया ऐकण्यास आम्ही उत्सुक आहोत. अशा मोजक्या प्रतिक्रियांना प्रसिद्धीही दिली जाईल. या सुवर्णमहोत्सवी वर्षात सर्व वाचकांनी सद्धर्मकरिता आणखी एक तरी नवीन वाचक देण्याचा संकल्प केल्यास ते सद्धर्म त्रैमासिकाकरता उचित योगदानच होणार आहे.

●●●


**वृत्तपत्र नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.**

**१. प्रकाशन स्थळ : लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४०० ६०१**

**२. प्रसिद्धीचा नियत काल : दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेस.**

**३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : अनंत विनायक धोरे, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे.**

**४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : वरीलप्रमाणे.**

**५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय पत्ता वरील प्रमाणे.**

**६. एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तीसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट. पत्ता वरीलप्रमाणे.**

**मी अनंत विनायक धोरे, जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.**

**सही - अनंत विनायक धोरे**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर

**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१

**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१